अमृत कुंभ

परमपिता शिव परमात्मा

वर्ष १५ | अंक २ | जून - जुलै २०२१ | मूल्य रु. १३/-

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माजी मुख्य प्रशासिका राजयोगिनी दादी जानकीजी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ भारत सरकारने दि. १२ एप्रिल २०२१ रोजी पोस्टाचे तिकिट प्रकाशित केले. माननीय उपराष्ट्रपती भ्राता वेंकय्या नायडू, कायदा, ईलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती व तंत्रज्ञान मंत्री भ्राता रविशंकर प्रसाद आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम १२ एप्रिल २०२१ रोजी दुपारी ४:३० वाजता राष्ट्रपती भवनाच्या 'सरदार वल्लभभाई पटेल सभागृहात संपन्न झाला तेव्हा संस्थेच्या वतीने ब्र.कु. आशादीदी, ब्र.कु. शिवानी तसेच ब्र.कु. मृत्युंजय उपस्थित होते.

ब्रह्मकुमारी संस्थेची स्थापना १९३७ साली सिंध हैदराबादेत झाली. त्यानंतर साधारण दीड वर्षातच दादी जानकीजींनी वयाच्या २१ व्या वर्षी संस्थेत प्रवेश केला. अनेक वर्षे परिचारिका म्हणून ब्रह्मावत्सांच्या सेवेत त्यांनी काळ सफल केला. राजयोगाच्या साधनेतील परमोच्च स्थिती गाठण्याच्या प्रवासात त्यांना 'सर्वोच्च स्थिर मनाच्या स्वामिनी' यासारखे अनेक गौरव प्राप्त झाले. विंग्ज ऑफ सोल, कम्पॅनियन ऑफ गॉड आणि इतर काही पुस्तकांचे लेखन दादीजींनी केले. अनेक आंतरराष्ट्रीय आध्यात्मिक सभा संमेलनांचे अध्यक्षपद दादीजींनी भूषविले. हजारो मनुष्यात्म्यांना अध्यात्माची प्रेरणा देत वयाच्या १०३ वर्षांपर्यंत सक्रीय आयुष्य जगल्या आणि २७ मार्च २०२० रोजी देहाचे सार्थक केले.

भिलवडी – ईश्वरी संदेश देणाऱ्या स्वर्णिम भारत रथाचे भिलवडी गावात आगमन झाले. त्याद्वारे ईश्वरी संदेश दिल्यानंतर ग्रुप फोटोत बँक मेनेजर भ्रा. महेंद्र अप्पा लाड, ब्र. कु. मीरा, ब्र. कु. निवेदिता व अन्य.

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

अमृतकुंभ

अंतरंग

वर्ष १५, अंक २. जून – जुलै २०२१

मुखपृष्ठाविषयी

ईशु दादीजी, ईश्वरी ज्ञानयज्ञातल्या एक अमोल रत्न होत्या. आपल्या अंतर्मुख वागण्याने त्यांनी सर्वांवर एक अलौकिक छाप उमटवली. 'सर्वसाधारणपणे अंतर्मुख व्यक्ती कमी जनसंपर्क निर्माण करते असा एक समज आहे', तो दादीजींच्या बाबतीत पूर्णपणे गैरलागू ठरला. मनांत सर्वांविषयी समभाव आणि प्रेमभाव असेल तर आपसूकच जनसंपर्क वाढतो. 'परमात्मा शिव' या सृष्टीरूपी कल्पवृक्षाचे बीज आहेत आणि त्या बीजाला स्नेहरूपी पाणी दिल्यास, ते वृक्षाच्या पाना–पानापर्यंत पोहोचते, हे आध्यात्मिक गुह्य रहस्य दादीजींच्या जीवनातून प्रकट होत असे. दादीजींनी अनेक वर्षे 'किरकोळ रोकड' (पेटी कॅश) साकार बाबांच्या काळापासून ते अगदी शेवटपर्यंत अत्यंत प्रामाणिकपणे सांभाळली. त्यांच्या या गुणामुळेच बाबा, त्यांना प्रेमाने 'मनी प्लांट' संबोधत. अशा दादीजींनी मे २०२१ महिन्यात आपला देह ठेवावा ही एक मोठी घटना म्हणावी लागेल.

– प्रकाशक अमृतकुंभ

१. राजयोगिनी ब्रह्माकुमारी ईशु दादीजींचे देहावसान २
२. संपादकीय... यत्र नार्यस्तु पूज्यन्ते... ३
३. विद्यामर्थं च साधयेत ६
४. बाबांचा सुपुत्र बनणे हाच पूर्ण वारसा हक्क ... ८
५. गहिऱ्या अंत:करणाच्या – दादी ईशुजी ९
६. सर्वस्व ईश्वरार्पण करणाऱ्या गुलजार दादीजी १०
७. चिंतन १२
८. विश्वशांती आणि एकात्मता १३
९. सिरी भारू होई १५
१०. कोविडशी लढताना बाबांची मदत १६
११. महातपस्विनी ऋषिपुत्री राजयोगिनीदादी बृजशांता १७
१२. कर्मसिद्धांत १९
१३. घे भरारी गगनात २२
१४. माझा गुलजार दादीजींशी स्नेहबंध २४
१५. भारतीय संस्कृती आणि संस्कार २५
१६. मना सज्जना... २७
१७. भेट भगवंताची (कविता) २८

फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

वर्गणी पाठविण्याचा पत्ता :
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट्स्, २२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) – ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४००६०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक ब्र. कु. सचिन उपाध्ये.

वार्षिक वर्गणी रु. ७५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,४००/–

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या** – www.amrutkumbh.com

राजयोगिनी ब्रह्माकुमारी ईशु दादीजींचे देहावसान

राजयोगिनी ब्र.कु. गोदावरी दीदी, प्रकाशिका अमृतकुंभ

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या अतिरिक्त मुख्य संचालिका (Additional Spiritual Head) आदरणीय राजयोगिनी ब्र.कु. दादी ईशुजी दिनांक ६ मे २०२१ रोजी आपल्या पार्थिव देहाचा त्याग करून बाबांच्या कुशीमध्ये विश्रामी झाल्या. ईशु दादींचे ईश्वरी यज्ञातील अव्यक्त नाव 'पूर्ण शांता' होते.

आदि रत्न ईशु दादी यज्ञातील कार्य व्यवहार कुशलतेने सांभाळत असत. एकनामी बनून (मेरा तो एक शिवबाबा) (काटकसरीने वागणं) इकॉनॉमीचा संस्कार, मन-वचन - कर्माद्वारे प्रामाणिकपणे ईश्वरी यज्ञाची अखंड सेवा करणं खरोखरीच प्रेरणादायी होतं. देश विदेशातील अनेक सेवा सांभाळताना त्या कायम हसतमुख असायच्या. 'हा भगवंताचा ज्ञान-यज्ञ आहे, हे कार्य म्हणजे ईश्वरी सेवा आहे, ही सेवा करण्यासाठी बाबांनी मला निमित्त बनवलं हे माझं परमभाग्य!' असा निमित्त भाव सदैव धारण करून वावरणाऱ्या ईशु दादींनी बापदादांना सर्वार्थाने ओळखलं होतं. मागील काही वर्षांपासून दादीजी शांत, एकांतप्रिय बनून स्वतःला सर्वगुणसंपन्न बनवण्याच्या पुरुषार्थामध्ये मग्न होत्या. एक शिवबाबांच्या आठवणीत रममाण झालेल्या दादींच्या साधनेचे तेज त्यांच्या चेहऱ्यावर विलसत असे. त्यांचं मंद स्मित पाहणाऱ्याला अव्यक्त देवदूत स्वरूपाची प्रचीती देत असे.

एखादी कॉन्फरन्स किंवा विशेष रूपात कुणाची (व्हीआयपीची) सेवा असो, दैवी परिवाराशी संबंधित दादीजींची विशेष यज्ञसेवा असो, नेहमीच सर्वांना आपलेपणाची

जाणीव होत असे. अनेकदा मी ते अनुभवलं आहे. 'तुम्ही सगळे बाबांच्या घरात आलात. तुमचं स्वागत आहे. मला खूपच आनंद झालाय.. असेच येत रहा' म्हणत प्रसन्नवदनाने त्या वातावरण भरून टाकत. दोन्ही बाहू पसरून सर्वांना सामावून घेत आहे असे हावभाव करणाऱ्या दादींना पाहून सगळे आनंदित होत असत. त्या निःस्वार्थ, आत्मिक प्रेमाने भारावून गेलेल्या प्रत्येकाला आपण योग्य ठिकाणी आल्याची जाणीव व्हायची. ईशु दादींनी सर्वांना खूप चांगले ईश्वरी संगोपन दिले, प्रेमाने सांभाळ केला.

अशा आपल्या ईशु दादींना लाख लाख धन्यवाद आहेत. त्या पवित्र आत्म्याला श्रद्धासुमन अर्पण करत आहोत.

***



(संपादकीय)

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते...

सृष्टीचक्राच्या आरंभीच्या काळात स्त्री – पुरुष समानता होती असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सत्ययुग आणि त्रेतायुगात श्री लक्ष्मी – श्री नारायण किंवा श्रीराम आणि श्रीसीता यांच्या संदर्भात देवीचे नाव पहिले घेतले जाते. आणि असे असून आजपर्यंत ही गोष्ट आपल्याकडच्या पुरुषप्रधान समाजाला कधीही खटकली नाही. काळ बदलत गेला आणि देहभानाच्या प्रभावाखाली मनुष्यात्मा स्त्री–पुरुष हा भेद करत गेला. निसर्गाने दोन प्रकारची शरीरे निर्माण केली आहेत. आत्मभान द्वापरयुगापासून लोप पावले, देहभान वाढीस लागले आणि विकारांची उत्पत्ती झाली. वेदकाळातील काही उदाहरणे सगळ्यांना ठाऊक आहेत, जसे मैत्रेयी, गार्गी ह्या विद्वान स्त्रियांनी तो काळ गाजविला. त्याकाळी स्त्रियांना उपनयन संस्काराचे अधिकार होते. ज्ञान संपादन करण्याचा पूर्ण अधिकार होता असे वर्णन आढळते. केवळ संपादनच नव्हे तर ज्ञानप्रदानाचाही अधिकार होता. नंतरच्या काळात पुरुषप्रधान संस्कृतीच्या एकांगी विचारसरणीच्या प्रभावाने हे सगळे मागे पडले.

पूर्वीपासून स्त्रियांनी रणांगणातील पराक्रमाचे क्षेत्रही गाजविले आहे. रामायणातील वर्णनाप्रमाणे कैकयीने दशरथाला एका युद्धात मोलाची मदत केली होती. पुरुषांप्रमाणे स्त्रियांनीही गरजेपोटी शोध लावले आहेत. विशेष म्हणजे प्राचीन काळात स्त्री शोधकाना देवतेचा मान मिळत असे. शेतात खपून काढलेले पीक गोळा करणारी अनामिक स्त्री पुढे पलास अथेना नावाची ग्रीकांची देवता झाली. तिने नांगर आणि धान्य कसे सडावे हे शोध लावले, असे मानतात.

इसवी सनापूर्वी तीन हजार वर्षे, चीनचा सम्राट 'व्हांग ते' याची राणी 'लिंग शे' हिने रेशमाचा शोध लावला होता. तसेच कालवे, पाणथळ जागी रस्ते उंचावणे व पूल यांची संरचना असे शोध तिच्या नावावर जमा आहेत. बॅबिलॉनची तरंगती बाग त्याच आधारावर बांधण्यात आली.

स्त्रिया आणि समाजसुधारणा, स्त्रिया आणि संशोधन, विज्ञान, स्त्रियांचे नेतृत्व अशा अनेक अंगांनी या विषयाकडे पाहता येईल. त्यानंतरचा काळ विचारात घेतला तर संमिश्र उदाहरणे सापडत जातात. म्हणजे साधारण गेल्या पाच–सहाशे वर्षातल्या इतिहासात डोकावून पाहिले तर भारताबाहेर काही ठिकाणी स्त्रियांना अधिक प्रमाणात मोकळीक मिळाली. भारतातही स्त्रियांनी राज्ञीपद भूषविले. झाशीच्या राणीबरोबर तिच्या सख्या, दासी लढल्या. त्या बायकांनी एका रात्रीत पडलेला बुरूज बांधला व सकाळी युद्धआघाडी सांभाळली झाशीची राणी, जिजाबाई ह्यांचेविषयी काही वेगळे बोलायची आवश्यकता नाही. आपल्याला 'फ्रांन्सच्या लेडी जोन ऑफ आर्कची' आठवणही असेल. एका शेतकऱ्याच्या मुलीने अनेक पीडितांचा आवाज सामूहिकपणे उठविला फलश्रुतीत तिला आपले प्राण गमवावे लागले. ब्रिटिशांनी तिला जिवंत जाळले. पुरुषप्रधान संस्कृतीचे परिणाम आपल्याकडे संस्कृत साहित्यावरही झाले.एके काळी 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः' असे वर्णन करणारी भाषाही, स्त्रियाणि रत्नानि म्हणजे सुभाषिताप्रमाणे स्त्रियाही रत्नासमान आहेत आणि त्यांचा अधिकाधिक संचय करावा असे वर्णन करू लागली.

'समाजसुधारणा आणि स्त्रिया' याविषयातही स्त्रियांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. सावित्रीबाई फुल्यांनी शेण–गोटयांचा मार सहन करून स्त्री–शिक्षणाचा पुरस्कार

केला. प्लेगच्या साथीत पुरुषांच्या बरोबरीने काम केले. यशोदाबाई आगरकरांनी पतीच्या निधनानंतर केशवपन, सती जाण्याला ठणकावून विरोध केला. आनंदीबाई कर्व्यांनी 'आश्रमाची आई' बनून काम केले. लक्ष्मीबाई टिळकांनी टाक वापरता येत नसल्याने, काड्यापेटीच्या काडीने 'स्मृतिचित्रे' ग्रंथ लिहिला. अत्र्यांनी त्यांचे वर्णन 'साहित्यलक्ष्मी' असे केले.

पण ही झाली गतकाळातील उदाहरणे. आज असे एकही क्षेत्र नाही, जिथे स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करीत नाहीत.

ज्योती नाईक	लिज्जत पापड
नयना किडवाई	एच्. डी. एफ. सी.
तर्जनी वकील	एक्झीम बँक
इंद्रा नूयी	पेप्सीको कं.
सुलज्जा मोटवानी	कायनेटीक इंजिनीयरींग

अशा अनेक संस्थांमधे स्त्रिया प्रमुख पदभार सांभाळत आहेत. आजच्या काळात किरण बेदींनी तिहार कारागृहाची जबाबदारी पेलून समाजाचा ढासळणारा बुरूज सांभाळण्यात हातभार लावला.

डॉ. आनंदीबाई जोशींनी भारतातील स्त्रियांच्या वैद्यक शास्त्रातील शिक्षणाचा पाया रचला.

राजकारणातही स्त्रिया मागे नाहीत. समाजसेवेत मदर तेरेसा अग्रेसर होत्या. डॉ. रोहिणी गोडबोले यांना २०१९ मध्ये पद्मश्री पुरस्कार प्राप्त झाला आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका लेखात त्यांनी खंत व्यक्त केली आहे. संशोधन क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग भारतात फारच कमी आहे. (संदर्भ : लोकसत्ता पुरवणी चतुरंग ६ फेब्रुवारी २०२१). काही वर्षांपूर्वी महिला दिनानिमित्त अशीच मतं प्रसारमाध्यमातून व्यक्त झाली होती. त्यानुसार जागतिक पातळीवरही संशोधन क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग फार मोठा आहे किंवा समान आहे असं नाही; पण भारतापेक्षा नक्कीच चांगला आहे. अशाच प्रकारे अनेक स्त्रिया वकिली करतात; पण खूप प्रसिद्धी मिळालेल्या वकील स्त्रिया किती? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मिळवणे कठीणच आहे.

स्त्रिया आणि अध्यात्म ह्याचा संदर्भ ज्ञानेश्वरांच्या काळापासून पाहिला, तर उद्विग्न ज्ञानेश्वरांना 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' सांगणारी मुक्ताई होती. नामदेवाच्या घरी काम करणारी जनाबाई असे सांगून गेली, 'घार जरी आकाशी लक्ष तिचे पिलापाशी' तसे माझे मन काम करताना विठ्ठलापाशी असते. समर्थ रामदासांनी 'वेणाबाई' नावाच्या शिष्येस विशेष अधिकार दिले. तरुणपणी वैधव्य वाट्याला आलं; पण समर्थांच्या सान्निध्यात जीवन उजळून गेलं. समर्थांनी तिला 'वेणास्वामी' नाव प्रदान केले, कीर्तन करण्यास शिकविले, मठाधिपती बनविले, तिचे जीवन सफल झाले. नंतरच्या काळात विवेकानंदांच्या सान्निध्यात भगिनी निवेदिताना आपल्या आयुष्याचे ध्येय गवसले. स्त्रियांना संन्यास धर्माची अधिकृत दीक्षा मिळणे ही एक प्रकारे क्रांतीच म्हणावी लागेल.

१९३७ साली परमात्मा शिवपित्याने दादा लेखराज यांना निमित्त बनवून गीता ज्ञानयज्ञ आरंभला. त्या काळी 'ओम मंडळी' म्हणून ओळखली जाणारी संस्था पुढे प्र. ब्र. कु. ई. वि.वि. म्हणून विकसित झाली. पण जेव्हा या कार्याची सुरुवात झाली तेव्हा मातेश्वरी जगदंबा यांना प्रमुख नेमले गेले त्यावेळेस त्या अल्पवयीनच होत्या. ब्रह्मचर्य व्रताच्या धारणेतूनच अनेक प्रकारे विरोध झाला. न्यायालयात प्रकरण गेले तेव्हा मातेश्वरींनी आपल्या सडेतोड युक्तिवादाने निर्भीडपणे न्यायाधीशांनाही अंतर्मुख केलं. त्यांच्या पश्चात दीदी मनमोहिनी आणि दादी प्रकाशमणींनीही समर्थपणे कार्यधुरा सांभाळली. त्यांना साह्यभूत ठरल्या दादी जानकीजी. साधारणपणे आपल्याकडे असे म्हटले जाते, एका घरात दोन स्त्रिया म्हणजे सासू-सून क्वचितच न भांडता राहतात. पण इथे मात्र संस्थेचा विकास जसजसा होत गेला, तसतसे सगळीकडे माता-भगिनींनी नेतृत्व स्वीकारले. नुसतेच स्वीकारले नाही तर ते समर्थपणे पेलले. आज संस्थेच्या चार हजाराहून अधिक शाखा आहेत आणि बहुतेक सर्व ठिकाणी स्त्रियाच नेतृत्व करत आहेत. महिला सशक्तीकरणाचा याहून वेगळा दाखला अन्यत्र मिळणे कठीणच असेल.

दादी जानकीजीच्या कार्याचा धावता आढावा घायचा तरी आपण थक्क होतो. १९१६ साली जन्माला आलेली एक वामन मूर्ती खऱ्या अर्थाने आपल्या कर्तृत्वाने जगावर प्रभाव टाकते ही अनन्यसाधारण गोष्ट आहे. एखाद्या बिझिनेसमधील निकष लावून पाहिले तर दादीजींचे यश गगनाच्या उंचीचे भासते. आपण 'ग्रीन फिल्ड प्रोजेक्ट' असा उल्लेख एखाद्या नव्या उद्योग उभारणीसाठी करतो. दादीजींनी देशाबाहेर संस्थेच्या कार्याचा विकास करायची जबाबदारी स्वीकारली तेव्हा त्या वयाने साठीच्या जवळ होत्या. त्यांच्याकडे असलेले 'स्किल सेट' काय होते असा आपण विचार केला तर आजच्या बिझिनेस जगतातील काहीही नव्हते. इंग्रजी येत नसताना लंडनला गेल्या. इतक्या वयाच्या असूनही त्यांनी अशी तक्रार केली नाही की आता मी ही जबाबदारी कशी पेलू? लौकिक अर्थाने शिक्षण किती? तिसरी किंवा चौथी उत्तीर्ण. लंडनला गेल्या तेव्हा तिथे भाड्याने घेतलेल्या छोट्याशा सेवाकेंद्रावर राहून त्यांनी सुरुवात केली. तिथून पुढे खरोखरीच त्याचा 'वेलू गेला गगनावेरी' म्हणजे गगनाच्याही पार पलीकडे गेला असं म्हणावंसं वाटतं.

परदेशात अनेकानेक सेवाकेंद्रे उघडण्यात दादीजींचा मोठा सहभाग होता. जसा एखादा बिझिनेसमन जितका व्याप वाढवतो तितका अधिक प्रवास करू लागतो तसं दादीजींनी एकशे चाळीस देशात ईश्वरी सेवेनिमित्त भ्रमण केले. अनेकांना आध्यात्मिक मार्गावर चालवण्यात मार्गदर्शक बनल्या. या सगळ्या खटाटोपात व्यक्तिगत साधनेवरील लक्ष जराही कमी होऊ दिले नाही. याचा एक मोठा पुरावा म्हणजे त्यांना मिळालेला पुरस्कार 'द मोस्ट स्टेबल माईंड इन दी वर्ल्ड' म्हणजेच जगातील सर्वात स्थिर मनाची व्यक्ती. १९७८ साली टेक्सास विद्यापीठाच्या वैद्यकीय आणि विज्ञान विभागातील शास्त्रज्ञांनी काही चाचण्या केल्या. आपण जे विचार करतो ते आपल्या कृतीतून जसे प्रकट होतात तसे मेंदूतून लहरींच्या रूपातही बाहेर पडतात. मेंदूतून बाहेर पडणाऱ्या लहरींचे मापन ई. ई. जी. (इलेकट्रो एन्सेफेलो ग्राफ) नावाच्या यंत्राद्वारे मोजतात. जेव्हा आपण गाढ निद्रेचा अनुभव करतो तेव्हा आपला मेंदू 'डेल्टा' नावाच्या लहरी सोडत असतो. जागेपणी 'अल्फा, बीटा' अशा अन्य कंपनतेच्या लहरी बाहेर पडत असतात. दादीजींच्या बाबतीत जागृत अवस्थेत निघणाऱ्या लहरी अचानक आवाज केला, सुई टोचली तरी अबाधित होत्या इतक्या स्थिर मनाचे दर्शन त्यांनी शास्त्रज्ञांना घडविले. एक प्रकारे अध्यात्माचा विज्ञानावर विजयच म्हणावे लागेल.

त्यांना मिळालेले पुरस्कार आणि त्यांनी सक्रिय सहभाग घेतलेले अनेक आंतरराष्ट्रीय कार्यक्रम नुसते लिहायचे म्हटले तरी दोन पाने खर्च होतील. वयाच्या एकशे तीन वर्षापर्यंत संपूर्णपणे सक्रिय राहिल्या. साधारण चाळीस हजार समर्पित ब्र. कु. बहिणींच्या त्या मार्गदर्शक होत्या. एवढी कार्यमग्न दिनचर्या सांभाळताना सदैव हसतमुख आणि प्रेरणादायी व्यक्तित्व प्रत्येकाने अनुभवले. कधीही कुणावर रागावल्या नाहीत किंवा कुणाच्या वागण्याने स्वतः दुःखी झाल्या नाहीत.

त्यांच्या पश्चात पंच्याण्णव शहाण्णव वयाच्या दादी रतनमोहिनीदेखील कार्यभार सांभाळत आहेत. आजही दिवसातले काही तास कार्य करतात. नुसतेच दीर्घायुष्य नाही तर संपूर्ण कार्यकुशल आणि सक्रिय नेतृत्वाच्या रूपाने बघायला मिळते. इथे 'वार्धक्य' या शब्दालाही लाज वाटावी अशी स्थिती आहे. या सर्व महान स्त्रिया ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध आहेत. नैसर्गिक प्रवृत्तीनुसार प्रकृतीच्या कुरबुरी असल्या तरी या सर्व दादींची प्रकृतिजीत स्थिती पहायला मिळते. सामान्य माणसाच्या जीवनात एवढे वय गाठले तरी इतकी सक्रियता अभावानेच आढळेल. या सर्व दीर्घायुषी साधकांचे रहस्य काय? राजयोग. परमात्म्याशी बुद्धीद्वारे संयुक्त राहण्याचा सुंदर विधी. स्वतः परमात्मा शिव हा योग शिकवत आहे आणि त्याचे चालते बोलते उदाहरण म्हणजे या सर्व दादी.

ब्रह्माबाबा म्हणजेच 'दादा लेखराज' ह्या सिंध प्रांतातील हिऱ्याच्या व्यापारात गुंतलेल्या सज्जन माणसाला काही साक्षात्कार झाले व पूर्ण वैराग्याची प्राप्ती १९३७च्या दरम्यान झाली. व्यापार

(पान क्र. ११ वर)

विद्यामर्थं च साधयेत

ब्र.कु. गोदावरी दीदी, प्रकाशिका, मुलुंड

संस्कृतात म्हटल्याप्रमाणे 'अजरामरवत्प्राज्ञो विद्यामर्थं च साधयेत' म्हणजे आपण अजर, अमर आहोत, असे समजून ज्ञानी मनुष्य सदैव विद्या आणि (ज्ञानरूपी) धन मिळवण्याची साधना करत राहतो. कुठलाही हुशार विद्यार्थी आपल्या गृहपाठ आणि अभ्यासावर लक्ष केंद्रित करतो. त्याचप्रमाणे ईश्वरी विश्व विद्यालयातील विद्यार्थीदेखील 'पास विद ऑनर' अर्थात् सर्वोच्च श्रेणीत उत्तीर्ण होण्याचंच उद्दिष्ट ठेवतो. त्यासाठी 'जोपर्यंत श्वास आहे तोपर्यंत ज्ञानामृत प्राशन करणे' अनिवार्य आहे हा निश्चय महत्त्वाचा ठरतो. या ज्ञानमार्गावर चालणे म्हणजे एखाद्या डोंगरकड्यावर चालण्यासारखे आहे. सतत लक्ष ठेवून चालणे आवश्यक आहे. अलौकिक ब्राह्मण जीवन जगणे म्हणजे अनेक गोष्टींपासून स्वतःला सुरक्षित ठेवणे. उदा. १) संशय, २) विस्मृती, ३) बाजारू गप्पा, ४) देहाभिमान, ५) व्यर्थ विचार, ६) संगदोष, ७)परचिन्तन, ८) ईर्षा, ९) किरकोळ चिंतन, १०) माया – रावण यांच्या जाळ्यात गुरफटणे, ११) वेळ,शक्ती, विचार आणि श्वास व्यर्थ दवडणे. ईश्वरी विद्यार्थ्यांसाठी नित्य ज्ञानामृत प्राशन अत्यावश्यक आहे. २१ जन्मांच्या राज्यपदासाठी बाबा आपल्याला जणू २१ पायऱ्यांचा सोपान मार्गच समोर ठेवतात. बाबांच्या शिकवणुकीतील या २१ पायऱ्या काय आहेत त्या पाहूया.

१ ली पायरी – सदैव स्मरण हवं – आपण बाबांची मुले आहोत, एका पित्याची लेकरे आहोत. एकात्मतेच्या सूत्रांत स्वतःला बांधणे महत्त्वाचे आहे. रहाटाला बांधलेल्या दोरखंडाने बादलीभर पाणी काढता येते. तो दोरखंड म्हणजे अनेक छोट्या छोट्या दोऱ्यांचा बनलेला असतो, म्हणूनच तो इतका मजबूत असतो आणि त्याने एवढे बादलीभर पाणी सहज वर आणता येते. हे आहे एकात्मतेचे बळ.

२ री पायरी – उद्दिष्ट श्रेष्ठ आहे. पल्ला लांबचा आहे. तो गाठताना संगदोषामुळे आपलं भान सुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून 'एक बाबा' आणि तुलसीदासांनी म्हटल्याप्रमाणे 'एक बल एक भरोसे' मार्गक्रमण करणे गरजेचे आहे.

३ री पायरी – ज्याप्रमाणे युद्धावरील सैनिक, मिळालेल्या आदेशानुसार दक्ष असतो, त्याप्रमाणे बाबा म्हणतात, तुम्हांलासुद्धा मायेच्या आक्रमणापासून स्वतःचा बचाव करणे क्रमप्राप्त आहे. यासाठी ज्ञानबाण चालवून संगमयुगी लक्ष्मणरेषेच्या आत राहून स्वतःचा बचाव करा.

४ थी पायरी – सध्याच्या काळानुसार मितभाषी आणि मधुरभाषी बनणे आवश्यक आहे. या अभ्यासाद्वारे ईश्वरी सेवेत स्वतःला गुंतवून घेणे हे आद्य कर्तव्य आहे.

५ वी पायरी – असे म्हणतात,'वाहते पाणी सदैव निर्मळ राहते. त्यात कीटक, जंतू इत्यादींची वाढ होत नाही. त्याप्रमाणे ब्राह्मण भाऊ-बहिणींनीही आपला ज्ञानप्रवाह वाहता ठेवला पाहिजे. त्याचा लाभ इतरांनाही करून दिला पाहिजे. पाणी साचलं की ते दूषित व्हायला वेळ लागत नाही.

६ वी पायरी – ज्याप्रमाणे गाडीची चाके आपल्या सोबत सामान, प्रवासी, सगळ्यांना घेऊन जातात. रेलवेचे एंजिन सगळ्या डब्यांना घेऊन पुढे जात राहते. त्याचप्रमाणे सशक्त आध्यात्मिक पुरुषार्थी, ढेपाळलेल्या मनुष्यात्म्यांना घेऊन पुढे जातो. कलियुगरूपी फलाटावर उभे राहिलेल्या लोकांनाही संगमयुगी रेलवेत सामावून पुढे नेणारा तोच खरा आध्यात्मिक पुरुषार्थी.

७ वी पायरी – न तद्भासयते सूर्यो... आपल्याला या सूर्य-चंद्र तारांगणाच्याही पार पलीकडे असलेल्या ब्रह्माण्डात जायचे आहे. पृथ्वीच्या आकर्षणाला भेदून जायचे आहे. फरिश्ता अर्थात् देवदूत बनायचे आहे. यासाठी देहरूपी धरणीचे आकर्षण समाप्त करणे गरजेचे आहे. तरच आपण स्वतःसोबत इतरांच्या पंखात बळ भरून त्यांनाही जणू तिथपर्यंत उडायला मदत करू शकतो.

८ वी पायरी – शिवबाबा म्हणतात, 'मला ज्ञानी तू आत्मा प्रिय आहे'. ज्ञानी व्यक्तीचे लक्षण म्हणजे स्वतः ज्ञानामृत प्राशन करणारा आणि दुसऱ्यांनाही त्याचा लाभ करून देणारा. जो याबाबत दक्ष नाही, तो जणू अज्ञानी म्हणावा. तो आपली वाणी व्यर्थ बोलण्यात फुकट घालवतो. ज्ञानी व्यक्ती दृढनिश्चयी असल्याने आपल्या कर्मेंद्रियांवर विजय प्राप्त करतो.

९ वी पायरी –खरी आध्यात्मिक व्यक्ती म्हणजे एखादे चालते - बोलते आध्यात्मिक संग्रहालयच असते. अशा व्यक्तीत व्यर्थ विचारांचा जरासुद्धा संग्रह नसतो. त्याजागी केवळ शुद्ध आणि सकस विचारांचा संग्रह असतो.

१० वी पायरी – जर आपल्याला या मार्गावर पुढे जायचे असेल तर सांसारिक पदार्थ क्षणभंगुर आहेत हे जाणून त्याविषयीचे आकर्षण समूळ नष्ट केले पाहिजे. कलियुगी जुनाट संस्कारांवर आधारित असलेल्या मान्यता, रुढींचे ओझे टाकून द्यायला हवे. मृगतृष्णेसमान गोष्टी त्यागून खऱ्या वैराग्याची कास धरणे आवश्यक आहे.

११ वी पायरी – ज्याप्रमाणे जीर्ण झालेले छत थोड्या वजनाने देखील कोसळते त्याप्रमाणे मनातील ओझी शिवबाबांसमोर रिकामी केली पाहिजे. स्वच्छ अंतःकरणाने सगळं बाबांसमोर ठेवले पाहिजे.

१२ वी पायरी – आपल्यासोबत आपण धारण केलेले ज्ञानामृतच असणार आहे. तेच आपला देह सुटला तरी आपली सोबत सोडणार नाही. त्यामुळे कोळिष्टकांप्रमाणे आपले मनाचे जाळे पसरून ठेवता कामा नये. वेळ आली की त्यात आपला बुद्धीरूपी पाय गुंतता कामा नये.

१३ वी पायरी – बाबा म्हणतात तुम्ही सत्य मार्गावर चालणारी माझी म्हणजेच सत्य पित्याची मुले आहात. माझ्याशी एकनिष्ठ राहिलात तर तुमच्यातल्या कमतरता आपोआपच गळून पडतील.

१४ वी पायरी – स्वामी विवेकानंदांचे गुरू, रामकृष्ण परमहंस म्हणत, 'जतो दिन बाची ततो दिन शिखी'. म्हणजे स्वतःतील अपवित्रता किंवा स्वभाव-संस्कार बदलायचे असतील तर एकच धोशा लागला पाहिजे - जोवर जगणे तोवर शिकणे.

१५ वी पायरी – हे जगत म्हणजे प्रत्येकाच्या मनोरंजनासाठी एक खेळाचे मैदान आहे. पण भांडणतंट्यात गुंतलेला मनुष्य पाहिला की वाटतं हे एक जंजाळ आहे. मग त्यातून निराशेची भावना जागृत होते. ईश्वरी ज्ञानाने अतींद्रिय सुखाचा अनुभव होऊ लागतो आणि हर्षोल्लासातून हे खेळाचे मैदान एखाद्या सुंदर बागेप्रमाणे वाटू लागते.

१६ वी पायरी – बाबा म्हणतात,'कुठलेही कार्य नाईलाजाने करू नका. शुद्ध आणि श्रेष्ठ विचारांनी करा. या विश्वरूपी रंगमंचावर तुम्ही आपल्या श्रेष्ठ कर्माद्वारे माझा परिचय अनेकांना करून द्या. मूर्ती पाहून मूर्तीकाराची ओळख व्हावी तरच सर्वत्र जयजयकार निनादेल.

१७ वी पायरी – काहीजणं म्हणतात 'अपयशामुळे आमचं हृदय विदीर्ण होतं.' खरंतर अपयशाचं कारण असतं - आपले तोकडे प्रयत्न. कर्म करताना शिवबाबांवर मन एकाग्र करून प्रयत्न करणे आवश्यक आहे, याचं भान वेळोवेळी राहावं म्हणून नित्य ज्ञानामृत प्राशन गरजेचे आहे.

१८ वी पायरी – ज्ञानामृताद्वारे आपला आत्मविश्वास वाढतो. शक्ती प्राप्त होते. म्हणून ह्याने असे केले, अमक्यात अजून परिवर्तन नाही आले, इत्यादी... आपण असे म्हणू शकत नाही. जर आपल्या मनांत असे तरंग उमटत असतील तर समजावे आपण ज्ञानामृत प्राशनात कुठेतरी चूक करतोय. विधीनुसार करत नाही.

१९ वी पायरी – ज्ञानामृत प्राशन न करणारी व्यक्ती आळशी बनत जाते, कुणीतरी माझ्यासाठी छान तयार भोजन देईल

(पान क्र. ११ वर)

बाबांचा सुपुत्र बनणे हाच पूर्ण वारसा हक्क मिळविण्याचा सहज उपाय

(मातेश्वरी जगदंबा यांची अमोघ वाणी)

परमात्म्याला साजण (प्रियकर) असेही म्हणतात. परमात्मा आपल्या प्रिय मुलांना (आत्म्यांना) सांगतात की तुमची माझ्यापासून कशी ताटातूट झाली, आता पुन्हा कशी आपली भेट झाली आहे, आणि यातूनच तुम्हाला काय आणि किती प्राप्ती होणार आहे. तो स्वतःच स्वतःची ओळख करून देत आहे. भक्ती करतांना ज्याची जशी भावना त्यानुसार प्राप्ती होती; पण आता तो म्हणतो, माझे जे काही आहे ते सर्व माझ्या प्रिय लेकरांना मी भरभरून देतो आहे

परमात्म्याला आपले मानले की त्याच्याकडून आपल्याला संपूर्ण वारसा हक्क प्राप्त होईल, हे पूर्वी आपल्याला कुठे माहीत होते? भक्तीत सुद्धा परमात्म्याची विविध रूपात पूजा करीत होतो, तेव्हाही जशी भावना तशी प्राप्ती होत होती. पण त्यावेळी देखील असे कधी वाटले नव्हते की आपल्याला कधीतरी परमात्म्याचा पूर्ण वारसा प्राप्त होईल! भक्तीभावाने हे देखील म्हणत असू की तूच माझे सर्वस्व आहेस, पण आपण स्वतः एवढे श्रेष्ठ बनू आणि संपूर्ण वारसदार बनू! असे कधी कल्पनेतही नव्हते

पण आता आपल्याला समजले आहे आणि बाबा स्वतः सांगत आहेत की मला समर्पित व्हा आणि संपूर्ण हक्काचे वारसदार व्हा. एखाद्याला दत्तक घेतले तर त्याला आपोआप वडिलांकडून वारसा मिळतो. पण इथे आपल्याला बाबांचे बनल्यावर पुरुषार्थ सुद्धा करावा लागेल. श्रीमतानुसार वर्तन करून आपण लायक आहोत हे सिद्ध करावे लागेल. बाबांना आपले म्हटल्यावर पूर्ण आज्ञाधारक सुपुत्र बनावेच लागेल. त्या आधारावरच मग पूर्ण गुण (मार्क्स) मिळतील. दत्तक मुलगा कसाही असला तरी त्याला वारसा हक्क मिळतो. इथे मात्र तुम्ही जेवढे लायक बनाल, त्याप्रमाणे वारसा मिळेल. आत्ता केलेल्या पुरुषार्थाचा आधारावर तुम्हाला जन्म-जन्मांतरासाठी प्राप्ती होईल. जन्म-मृत्यूचे चक्र चालत राहूनही सुख मात्र जन्मोजन्मी मिळत राहील. म्हणून तेथील (सत्ययुग व त्रेतायुगात) मृत्यूला देखील मृत्यू म्हणता येणार नाही. इथे तसे नाही, इथे एखाद्याच्या भाळी अचानक मृत्यू असू शकतो. आज कोणाकडे धन असेल, तर त्याबरोबर दुःखही आहे, हे पाहून काहीजण म्हणतात की इच्छा करणे हेच वाईट आहे. कारण जिथे इच्छा तिथे दुःख आहे, मग जबरदस्तीने आपल्या इच्छाच दाबून टाकण्याचा प्रयत्न करतात. जेव्हा मनुष्याला सुख मिळत नाही, तेव्हा मग म्हणतात की हे सारे जगच 'मिथ्या' आहे. पण आपल्याला आता बाबांनी हे ज्ञान दिले आहे की हे स्थूल धन भविष्यात नक्कीच सुखदायी असेल, पण सारी संपत्ती पवित्र असणे आवश्यक आहे. शरीर आणि सारे जगच जेव्हा पवित्र असेल, तेव्हा हे धन सुख देईल. आता आपल्या जवळ पवित्रतेचे खरी शक्ती आहे, तिच्या प्रभावाने प्रत्येक गोष्ट पवित्र होत जाईल. या आत्ताच्या विकारयुक्त जगात जी पवित्रता आहे, ती शक्तिहीन आहे. कारण पवित्रतेबरोबरच विकारसुद्धा आहेत. त्यामुळे या विकारी जगातील पवित्रतेतही काही तथ्य नाही. धनसुद्धा तमोप्रधान आहे.

आपल्या बुद्धीत आता आपला पवित्र देश (परमधाम) आणि पवित्र भारत सदैव जागृत असतो. आपण राहतो या जगात, भले डोळ्यांना ते जगत दिसत असेल, पण तरी या जगापासून आपण बुद्धीने दूरच आहोत. आता तर सतत

(पान क्र.२१ वर)

गहिऱ्या अंतःकरणाच्या - दादी ईशुजी

ब्र.कु. सुदेश दीदी, जर्मनी

शिवबाबांच्या रत्नमाळेतील एक हीरा 'ईशुदादीजी' दि. ६ मे २०२१ रोजी दैहिक बंधनातून मुक्त होऊन सूक्ष्मवतनवासी झाल्या.

यज्ञस्थापनेच्या सुरुवातीला लहान मुलांच्या हॉस्टेलमध्ये दाखल झाल्या व पुढे ब्रह्माबाबा व मम्मा यांच्यासोबत राहून यज्ञसेवेत रुजू झाल्या. दादीजींमधील एकाग्रता व अचूकता या गुणांमुळे दादीजींकडे ज्ञानमुरली लेखनाच्या सेवेची संधी चालून आली. मुरली भराभर लिहिता यावी यासाठी त्यांनी स्वतःची अशी (Short Hand) लिपी विकसित केली होती. उदा. मुरलीत सृष्टीचक्र असा शब्द आला की दादी स्वस्तिकाचं (卐) चिन्हं काढत, आत्मा असं लिहिण्यासाठी (•) बिन्दु काढत. त्यामुळे सर्व मुरली भराभर लिहिता येत असे व ती मुरली Short Hand ते हिंदी भाषा अशी परत लिहून काढत व ती मुरली नंतर सर्व सेवाकेंद्रावर पाठवली जाई.

त्यांच्या या सेवेमुळेच साकार मुरलीच्या अविनाशी ज्ञानरत्नांचा खजिना आपल्यापर्यंत पोहचू शकला. जी गोष्ट ज्ञानधनाची तीच स्थूल धनाच्या बाबतीत ही दिसून येत असे. दादीजींच्या या गुणवैशिष्ट्यामुळे दादीजींकडे यज्ञाचा आर्थिक व्यवहार सांभाळण्याची सेवा सोपवली होती. दादीजींकडे एकेका पै अन् पैचा अचूक हिशोब असे व हे सर्व करत असताना चेहऱ्यावर निश्चिंतता व आपण यज्ञाचे विश्वस्त (ट्रस्टी) असल्याचा भाव दिसून येत असे. दादीजी खऱ्या अर्थाने अविनाशी ज्ञानरत्न व स्थूल धनाच्या खजिनदार होत्या.

दादाजींच्या लेखन कौशल्यामुळे दादीजी बापदादांची लेखणीच (व लेखनिक) बनल्या. ब्रह्माबाबांशी अनेक ब्रह्मावत्सांचा पत्रव्यवहार चालत असे. दर दिवशी कमीत कमी ९-१० पत्रं बाबा लिहीत असत. '6B' ग्रेडच्या जाड पेन्सिलने पत्र लिहीत असत व ती सुद्धा सिंधी भाषेत व खूप वेगाने लिहीत असत व ती पत्र त्यादिवशीच पोस्टात गेली पाहिजे असा बाबांचा कटाक्ष असे. या तीव्रगतीमुळे व सिंधी भाषेमुळे ती प्रत्येक ब्रह्मावत्साला वाचता येईल असं नव्हतं म्हणून दादीजी त्याच पत्रात कंसात तो शब्द हिंदी भाषेत लिहून काढत असत व नंतर ते पत्र पोस्ट केलं जाई.

''लिखे खुदा पढ़े मुसा'' उक्तीप्रमाणे दादीच बाबांचं पत्र वाचून ते तत्क्षणी हिंदीत अनुवादीत करत असत. ख्याली खुशालीच्या पत्रांबरोबरच इतरही अनेक व्यावहारिक, आर्थिक निर्णयाबाबत बाबांशी पत्रव्यवहार चालत असे. पण दादीजींच्या चेहऱ्यावर त्या गोष्टींचा लवलेशही दिसून येत नसे. दादीजी आरशाप्रमाणे स्वच्छ होत्या आरशापुढे ठेवलेली वस्तू किंवा दृश्य बदललं की आधीच्या दृश्याची पुसटशी रेघही दिसत नाही तसं दादींच्या चेहऱ्यावर पत्रातील मजकुराची 'ओळ'ही उमटत नसे.

ब्रह्मावत्सांच्या खासगी जीवनातील गोष्टी पत्रांद्वारे ब्रह्माबाबांकडे पत्र रुपाने येत असत पण त्या वाचताना किंवा त्यांना उत्तरं देताना दादीजीच्या मनावर त्याचा ओरखडा उमटत नसे. चित्रगुप्ताच्या अलिप्ततेने दादीजी कर्म करत व नदी जशी सागराला येऊन मिळते व स्वतःचं 'मी'पण विसरते तद्वत! ज्ञानसागरात ते पत्र व त्यातील मजकूर विसर्जित करीत असत. ह्या गुण वैशिष्ट्यामुळे दादीजींना बाबा 'विश्वासपात्र सचिव' असं संबोधत.

एकाग्रता, अचूकता, विश्वासार्हता व स्वभावातील लवचिकता अशा अनेक गुणांमुळे ईशुदादींजींनी बाबा-मम्मा, दादी-दीदी व नंतरच्या काळात मुन्नी दीदी व मोहिनी दीदी या सर्वांबरोबर अतिशय यशस्वीपणे कार्य केलं. यज्ञात ज्याप्रमाणे गुप्त राहून सेवा करत होत्या तशाच देह ठेवताना कुठलाही गाजावाजा न करता ६ मे २०२१ रोजी ही ज्ञानगंगा पुढील सेवेसाठी वाहती झाली!

***

सर्वस्व ईश्वरार्पण करणाऱ्या गुलजार दादीजी

भाग –२

ब्र.कु. राजू, मुरली विभाग, मा. आबू

गुलजार दादींच्याद्वारे प्रिय बाबांचे संगोपन आपल्या सर्वांना लाभले. त्या दादींचे गुणवर्णन करावे तितके थोडे आहे. अव्यक्त रूपातील संगोपनाच्या दीर्घ कालखंडातील जवळजवळ ५० वर्षे मला दादीजींचा सहवास लाभला. अव्यक्त बापदादांचे कार्य इतक्या जवळून निरखण्याचे भाग्य मला लाभले हा एक अलौकिक भाग्ययोगच म्हणावा लागेल. १९७१मध्ये माझी पहिली भेट घडली तो अविस्मरणीय प्रसंग होता. त्या काळी दादीजींच्या माध्यमातून बापदादा प्रत्येकास व्यक्तिगत भेटत असत. नंतर काळ बदलत गेला, ब्रह्मावत्ससंख्या वाढत गेली आणि बाबांच्या भेटीची रीत बदलत गेली. पण साकार ब्रह्माबाबांच्याद्वारे मिळणाऱ्या प्रेमाइतकेच प्रेम अव्यक्त रूपात देखील प्रत्येकाला मिळाले असे आजही आपण म्हणू शकतो. आणि या मीलनाचा आनंद दादीजींच्या द्वारे घडला, त्यांचे यातील योगदान वर्णनातीत आहे.

पाच तत्त्वांनी बनलेल्या देहाच्या काही मर्यादा असतात. त्या सर्व सांभाळूनही बापदादा अनेक तास आपल्याला भेटत असत त्या कार्याचा सगळ्यात जवळून अनुभव घ्यायचा योग माझ्या आयुष्यात आला. प्रकाशमणी दादीजी आणि मनमोहिनी दीदींजींनी मला निक्षून सांगितले होते, जेव्हा बापदादा अव्यक्त रूपात येऊन कार्य करत त्या दरम्यान मी एकही दिवस एकही मिनिट तिथून हालता कामा नये. बाबा जे काही बोलतात ते सगळे टिपून घेतले गेले पाहिजे. व्यक्तिगत संभाषणात ज्याच्यासाठी जे काही अमूल्य महावाक्य उच्चारतात ते नोंद करून त्यांना दे. अशी स्पष्ट सूचना मला होती. गरज पडल्यास मी बाबांची व्यक्तिगत मुलाखतीतील महावाक्ये टाईपही करून देत असे. गुलजार दादींच्याद्वारे बाबा जेव्हा भेटत तेव्हा बाबांच्या नेत्रात प्रेमाचा जणू महापूर उचंबळून आलेला जाणवे. परमात्मा प्रेमाचा सागर आहे हे भक्तीतील वर्णन प्रत्यक्ष 'याचि देही याचि डोळा' पहायला मिळे.

गुलजार दादीजी अनेकदा काही संदेश गहन ध्यानाद्वारे आणत. त्या 'सिंधी' भाषेत ते संदेश लिहून काढत. मी सिंधी भाषा शिकल्याने ते समजून वाचून पक्का मसुदा तयार करून दादीजींच्या हाती ठेवत असे. दादी – दीदींचा कटाक्ष असे, बाबांचा हा ज्ञानयज्ञ सुव्यवस्थित रीतीने चालला पाहिजे, प्रत्येक गोष्ट श्रीमतानुसार घडली पाहिजे. देश–विदेशातील सेवेसंबंधीच्या योजना बाबांच्या मार्गदर्शनानुसारच केल्या जात असत. त्यासंबंधी बाबांना विचारून मगच कार्य केले जाई, त्या सगळ्या महावाक्यांची नोंद करण्याचे कार्य मला करता आले हे माझे थोर भाग्य.

ध्यानाच्या गहन अवस्थेतून सूक्ष्म लोकातील अनेक रहस्ये गुलजार दादीजींमार्फत उलगडत गेली. गुलजार दादीजी ध्यानावस्थेत आपण काय पाहिलं, अनुभव केला ते सांगत असत. गुलजार दादीजी लौकिक जगतातील अनेक गोष्टीत निरागस होत्या. विकार काय असतात, विघ्न, लबाडी काय असते यापासून जणूकाही मैलोंमैल दूर होत्या. साकार बाबा नेहमी सांगत, या मुलीस (दादीजींना) कार्य व्यवहारातील दगदगीपासून शक्यतो दूरच ठेवा. साकार बाबांच्या काळातही शिवबाबांचे माध्यम बनून दादीजीनी काही योगदान ईश्वरी कार्यात केले आहे.

१८ जानेवारीला ब्रह्माबाबा अव्यक्त झाले आणि २१

जानेवारी १९६९ पासून २०१७ पर्यंत दादाजींच्या माध्यमाद्वारे बापदादांनी आपली महावाक्ये उद्धृत केली. हा ज्ञानयज्ञ पुढे कसा चालवावा याबाबतचे मार्गदर्शन केले. साकार बाबांच्याद्वारे जी महावाक्य उच्चारली त्याची उजळणी करा असे सांगितले. शिवबाबांनी साधारण ३३ वर्षे ब्रह्माबाबांच्या द्वारे ज्ञानमुरली सांगितली, ते पाहता ब्रह्माबाबा म्हणजे शिवाची वाणी प्रकट करणारे जणू बृहतनंदी बनले. अनेक शिव मंदिरात दोन नंदी पहायला मिळतात, त्यातील लघुनंदी समान दादीजींनी भूमिका बजावली. परमात्मा शिव आणि अव्यक्त स्थिती प्राप्त केलेल्या ब्रह्माबाबांच्या जोडीने दादीजींच्या द्वारे एकत्र भूमिका बजावली. दोन शक्तिशाली आत्म्यांची शक्ती स्वतःत सामावून घ्यायची हे काही सोपं काम नाही. दादीजी कर्मेंद्रियजीत होत्याच; पण प्रकृतिजीतही होत्या. त्या जिथे जातील तिथे त्यांच्या स्वागतासाठी प्रकृती जणू हात जोडून उभीच असते असे वाटे.

आज या तीन मुख्य दादी (प्रकाशमणीदादी, जानकी दादी आणि गुलजार दादी) देहाद्वारे आपल्यात नाहीत; पण सूक्ष्मरूपात त्या आपणां सर्वांसोबत कायमच आहेत. कालचक्राच्या नियमानुसार त्या आत्म्यांनी कुठेही जन्म घेतला असो, पण त्यांचे सूक्ष्म मार्गदर्शन आपल्याला, आजही लाभत आहे. जोपर्यंत नवसृष्टीच्या निर्मितीचे कार्य पूर्ण होत नाही तोपर्यंत या महान आत्म्यांचे सहकार्य लाभेलच आणि बाबा त्यांच्या संपूर्ण अवस्थेचे दर्शन सर्वांना घडवतीलच.

(भावानुवाद : ब्र. कु. चंद्रशेखर)

***

(पान क्र. ५ वरून)

सोडून दिला आणि मनुष्यास देवत्व प्राप्त करविण्याची किंवा महिला सशक्तिकरणाची सुनियोजित चळवळच सुरू झाली. १७ फेब्रूवारी १९३८ रोजी दादा लेखराज ह्यांनी अधिकृतरीत्या स्त्रियांची समिती नेमून त्यांचे हाती कारभार सोपविला. त्यांनाच विश्वस्त बनविले. तिथपासून आजपर्यंत संस्थेच्या जवळजवळ सर्व शाखांत स्त्रिया संचालिकेचे काम समर्थपणे पार पाडत आहेत. हेच खरे महिलांचे सबलीकरण म्हणावेसे वाटते. इथेच यत्र नार्यस्तु पूज्यते रमन्ते तत्र देवताः ही ओळ सिद्ध होते. हे जगातील आठवे आश्चर्यच म्हणावेसे वाटते. मानवाच्या उत्थानात अध्यात्म किती सुंदर काम करू शकते याचा प्रत्यय घ्यायचा असेल तर परमात्मा शिवाचे हे कार्य जवळून पाहणे, समजून घेणे आवश्यक आहे. याला चमत्कार म्हणायचा मोह होतो. म्हणूनच भक्तीत म्हणत असावेत 'मूकं करोति वाचालं'.

***

(पान क्र. ७ वरून)

तर बरे होईल. माझ्यावर असलेली ग्रहदशा टळण्यासाठी कुणी पैसे घेऊन जपजाप्य, मंत्रपठण पूजा – अर्चा करेल तर बरं होईल असा विचार करते. उलटपक्षी ज्ञानी व्यक्ती जागृत होते, विचार करते. आपले कार्य आपणच सिद्ध करू लागते. जसं दिव्यात तेल आवश्यक असते तसं रोज ज्ञानामृत प्राशनही आवश्यक आहे.

२० वी पायरी – बाबांच्या महावाक्यांनी आपल्याला खऱ्या अर्थाने समजूतदार बनविले आहे. बाबा म्हणतात, टीकेची झोड उठल्यावर रणांगण सोडून पळून जाऊ नका. निधड्या छातीने सामोरे जा. 'सत्यतेची नौका वादळांत डोलेल; पण बुडणार नाही' यावर विश्वास ठेवा. सत्यमेव जयते. विजय सुनिश्चित आहे. डळमळू नका.

२१ वी पायरी – कोमेजलेले फूल कुणालाही आवडत नाही. पडलेल्या चेहऱ्याचे दर्शन कुणालाही नकोसेच वाटते. ईश्वरी ज्ञानाद्वारे जीवनाला एक नवे वळण मिळते. अशांच्या मुखातून एकच घोष निघतो – वाह बाबा वाह! आणि मनांत निश्चय दृढ होतो – जोवर जगणे, तोवर ज्ञानामृत प्राशन करणे.

***

चिंतन

लंघन : ३

ब्र.कु. परशुराम, संगमनेर

कर्मासंबंधी लंघन पाळण्याचा एक अभ्यास अध्यात्मात सांगितला आहे. म्हणजे नक्की काय? व्यर्थ कर्म टाळणे, अतिरिक्त कर्म टाळणे म्हणजे कर्माबाबतचे लंघन. कर्माचे बीज-विचार किंवा संकल्प असते. एखादा विचार आधी मनांत येतो आणि मग तो कर्मात उतरतो. उदाहरण द्यायचे झाले तर मॉलमध्ये सहज म्हणून गेलेल्या माणसास दुकानात छान सुशोभित करून ठेवलेली एखादी वस्तू पाहून ती घ्यावी हा विचार येतो. गरज असो वा नसो. पण ती वस्तू विकत घेतली तर तो वायफळ खर्च आणि व्यर्थ कर्मात गणता येईल.

कधी कधी विचार न करताही कर्म केले जाते. उदा. रस्त्याने जाताना काहींना सवय असते, वाटेतल्या अनेक वस्तूंना उगाचच हात लावून पुढे जायचे किंवा घरात टीव्ही बघताना सहज म्हणून बसल्यावर हात किंवा पाय हालविणे हे व्यर्थ कर्म होय. इथे मनुष्य, संस्कारानुसार कर्म करतो म्हणजे विचारही करावा लागत नाही. कारण एखादी क्रिया पूर्वीपासून वारंवार केल्याने त्याची सवय जडली किंवा संस्कारात त्याचे रुपांतर झाले.

पण असे व्यर्थ कर्म घडले तर काय बिघडलं? यांत कुणाचे नुकसान तर केले नाही ना! म्हणजे काही पाप तर नाही घडलं असे एखाद्याला वाटू शकते.वरकरणी पाहता हा तर्क ठीक आहे; पण साधकासाठी अध्यात्म म्हणजे तलवारीच्या धारेवर चालणे आहे. कुठलेही कर्म, कर्मेंद्रियाच्या अधीन होऊन करणे म्हणजे एकप्रकारे साधकाचा पराभवच आहे. याकरिता अत्यंत जागरुक राहणे आवश्यक असते. मी आत्मा कर्मेंद्रियांचा मालक आहे, राजा आहे आणि कर्मेंद्रिये म्हणजे कर्मचारी माझ्या आज्ञेतच चालली पाहिजेत हेच अध्यात्माचे ध्येय असते. अशाप्रकारे जो स्वतःवर राज्य करतो, तो जगावर राज्य करू शकतो.

जाणीवपूर्वक कर्म करण्याबाबत एक गोष्ट सांगतात. गौतम बुद्धांसोबत एक शिष्य बागेत फेरफटका मारत होता. छान पिकलेला आंबा हाताशी आलेला पाहून बुद्धांचा हात पटकन् त्याकडे गेला. दुसऱ्या क्षणी त्यांनी विजेचा झटका बसावा तसा हात-मागे घेतला. काही क्षण जाऊ दिल्यावर त्यांनी पुन्हा त्या आंब्याकडे हात नेला ते पाहून शिष्य गडबडला. त्याच्या मनातील गोंधळ ओळखून बुद्ध म्हणाले, ''पहिल्या वेळेस मी भानावर नव्हतो आणि लोभवश कर्म घडणार होते, ते मी वेळीच रोखले. नंतरच्या वेळेस मात्र जाणीवपूर्वक (consciously) मी कर्म केले.''

दानकर्म करतानाही जागरूकच रहावं लागतं. दान हे नेहमी सत्पात्री असावं, याचाच दुसरा अर्थ आहे कुपात्रास केलेलं दान सफळ होत नाही. अनेक लोक गोर-गरिबास धनदान करतात. जर दान घेणाऱ्याने त्या पैशातून व्यसनपूर्ती केली तर ते विकर्म दात्याच्या हातून घडले असे मानावे ना! एखाद्या धनाढ्य व्यक्तीने देऊळ बांधले वा शाळा उघडली किंवा इस्पितळ उघडले, तर ते सत्कर्मच म्हणावे.

'कर्माची गती गुह्य आहे' असे गीताज्ञान सांगते.

याचाच अर्थ अनावश्यक असलेली कर्मे जर केली तर त्याचे अनावश्यक फळही मिळणारच. कर्माच्या हिशेबात फक्त बेरीज आहे. त्यामुळे अनावश्यक कर्माचेही सूक्ष्म ओझे मन-बुद्धीवर पडत राहते. यास्तव साधकाने कायम

(पान क्र.२१ वर)

विश्वशांती आणि एकात्मता

ब्र.कु. छाया, मुलुंड (पूर्व)

वैश्विक स्तरावर सर्व मनुष्य आत्म्यांची गरज विश्वशांती व एकात्मता ही आहे. परंतु ही गरज फक्त गरजेपुरती राहिली आहे. चार दिवसापूर्वीच आमच्या येथे एक भगिनी माझ्या समोर आली आणि म्हणाली, ''बहनजी, आज आमच्या बिल्डिंग खाली मी उतरले, तेव्हा बिल्डिंगमधील एक गृहस्थ भेटले आणि मला पाहून म्हणाले, ''काय हो तुम्ही नेहमी हसत राहता, नेहमी आनंदी दिसता. आमच्याच वाट्याला परमेश्वराने सर्व दुःख ठेवली आहेत. केवढा मोठा अन्याय परमेश्वर आमच्यावर करतोय''. तेव्हा भगिनीने उत्तर दिले, ''परमेश्वराने अन्याय नाही केला. तुम्हीच परमेश्वरावर अन्याय करताय.'' अवाक होऊन ते गृहस्थ म्हणाले, ''अहो मी कसा परमेश्वरावर अन्याय करणार? एवढी ताकद कुठे आहे माझ्यात? त्यावर त्या भगिनी म्हणाल्या, ''अहो परमेश्वराने तुम्हाला एवढा मोठा ३ रुमचा फ्लॅट दिला, मोठी गाडी दिली, मुले विदेशात आहेत तरी रडता? त्या भगिनी पुन्हा म्हणाल्या, ''अहो, सुख येईलच कसं तुमच्या पदरात? दुसऱ्यांच्या आयुष्यातील जमाखर्च पाहण्यातच तुमचं आयुष्य गेलं. सभोवार बघण्याचा दृष्टीकोन बदला तुमचं जग बदलेल''.

तात्पर्य लोकांना दुसऱ्याचं सुखंही खुपायला लागत. दुसऱ्याचं सुखं पाहून दुःखी होणारी माणसं आज या दुनियेत काही कमी नाहीत. अशा मनोविकृत अवस्थेत शांती नांदणार तरी कशी?

काही दिवसांपूर्वी मी आमच्या ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या साप्ताहिक पाठ्यक्रमाची सुरुवात करत असताना समोर २५ जणांचा समूह बसला होता. त्यांना एक प्रश्न केला, ''आपण सर्व इथे ज्ञान घेण्यासाठी आला आहात. त्याच्यामागचा उद्देश काय? तेव्हा प्रत्येकाने एकच उत्तर दिले 'मनःशांती' मी सहज हसत विचारले, ''का? गृहशांती, वास्तुशांती नको? मनःशांतीच का?'' तेव्हा त्या २५ जणांपैकी जवळ जवळ ५ ते ६ जणांनी एकच उत्तर दिले. ''अहो जिथे मनःशांती नाही तिथे गृहशांती आणि वास्तुशांती कुठून येणार?'' मलाही अपेक्षित उत्तर मिळाले होते. तेव्हा मी सर्वांना म्हटले, ''पहा उत्तरं तुमच्याकडेच होती. फक्त शोधण्याचा प्रयत्न केला नाही. मनःशांतीसाठी तुम्ही इथे आला आहात. परंतु शांती नावाची वस्तू नाही जी शोधल्याने सापडेल. जी हरवलीच नाही ती सापडणार कुठून?'' एवढी दुभंगलेली मनोदशा आज मानवाची झाली आहे. ज्याप्रमाणे 'तुझे आहे तुझपाशी आणि शोधितो याच्या त्याच्यापाशी' अशी आजच्या मानवाची अवस्था आहे.

मग मी सहज म्हटलं, ''मनाला शांती हवी आहे; पण मन कुठे आहे? ते तर दिसत नाही. मग मनात शांती येणार कशी? माझे म्हणणे ऐकून ते सर्वजण निरुत्तर झाले. मन हा शारीरिक अवयव असता तर जसे शारीरिक अवयवांवरती टॉनिकच्या गोळ्या दिल्या जातात. तसेच मनावर सुद्धा शांतीचे टॉनिक निघाले असते. ना मन शरीराचा अवयव आहे, ना शांती एखादी वस्तू आहे. प्रत्येक मानव आत्म्याचा स्वधर्म शांती आहे. स्वसंस्कार आहे, स्वभाव आहे, आभूषण आहे. परंतु स्वतःमधील या सर्व श्रेष्ठ शक्तींची स्वतःलाच ओळख नाही याच्यामुळे आज संपूर्ण समाज दुभंगत चालला आहे.

अशा प्रकारे प्रत्येक अर्जुन (आजचा मानव) दुभंगलेल्या मनःस्थितीत आहे. तेव्हा त्याच्या मनःस्थितीला अभंग करण्यासाठी मानसिक व्याधींना दूर करण्यासाठी दिलेले

बाळकडू म्हणजेच गीता. आज गीता फक्त वाचनात राहिली आणि आचरणातून गेली. जसे एखादे लहान मूल जोपर्यंत आईचे बोट पकडून चालते तोपर्यंत सुरक्षित असते. त्याप्रमाणे मानव आत्मा सुद्धा जोपर्यंत गीता या मातेचा म्हणजेच परमेश्वराद्वारे प्राप्त श्रीमताचा आधार घेऊन चालत होता तोपर्यंत सुरक्षित होता. आज भारतात अनेक महानुभाव होऊन गेले. त्यांनी शांतीसाठी अनेक मार्ग दाखवले आणि मानवाची शांतीकरिता भटकंती सुरू झाली. म्हणून गीतेच्या वचनाप्रमाणे स्वतः परमात्मा सृष्टीवर अवतरित झाले आहेत. ते राजयोगाच्या द्वारे आजच्या मानवातील बुरसटलेल्या संस्कारांना श्रेष्ठ बनवत आहेत. हे राजयोगाचे ज्ञान आपल्याला आपल्या शांतीच्या स्वधर्मात स्थित करत आहे. अर्जुन ज्यावेळी आपल्या आत्मभानापासून दूर झाला आणि दैहिक भानामध्ये येऊन ज्यावेळी त्याचा 'मी आणि माझे' हा मीपणा जागृत झाला त्यावेळी ईश्वराने त्याची मनःस्थिती ठीक करण्यासाठी जे वचनरुपी अमृत दिले तीच खरी 'गीता'.

परमेश्वराच्या एकेक महावाक्याने अर्जुनाचा स्वाभिमान जागृत झाला आणि अभिमान गळून गेला. गीतेत म्हटले आहे. 'सर्व धर्मान् परित्यज मामेकम् शरणं व्रज' म्हणजेच देहाचे सर्व धर्म विसरून तू बुद्धीला माझ्यापाशी समर्पित कर स्वधर्म सुख देतो. परधर्म दुःख देतो. 'स्व' म्हणजे तू एक आत्मा आहेस. पर म्हणजे शरीर, काया. स्वचा सर्वात प्रमुख धर्म आहे शांती. जिथे शांती होती तिथे सुख, संपत्ती, संतोष अशा अनेक गोष्टी मुबलक होत्या. परंतु परधर्म म्हणजेच देहाचा अभिमान मी, माझा, मी या जातीचा, या धर्माचा शारीरिक प्रतिष्ठा, शारीरिक वैभव, संपत्तीचा हा देह अभिमान जागृत झाला. तिथेच परधर्माने स्वधर्म संपवून टाकला. परमेश्वराने दैहिक मीपणा संपवून ज्यावेळेस आतल्या 'मी'ला जागृत केलं तेव्हा अर्जुनाची संपूर्ण परिस्थिती संतुलित झाली. कारण मानसिक संतुलन म्हणजेच खरी जीवन जगण्याची कला आणि मानसिक संतुलनासाठी हवी आहे 'स्व'ची प्रचिती.

स्व म्हणजे मी आत्मा, आत्म्याचा स्वधर्म आहे शांती. मन ही आत्म्याची एक विचारशक्ती आहे. विचारांचे श्रेष्ठत्व म्हणजे मानसिक शांतीचा आधार. मनःशांतीसाठी पहिल्यांदा ओम शांती बनावे लागेल कारण 'ओम शांती' हा केवळ मुखातून उच्चारण्याचा मंत्र नाही तर ती एक जगण्याची कला आहे. भक्तिमार्गामध्ये ३ वेळा ओम शांतीः। शांतीः। शांतीः। हा मंत्र उच्चारण्याची प्रथा आहे. परंतु मंत्राची यंत्रणा कुणालाही कळली नाही. 'ओम शांती' स्वच्या धर्माची जागृती आहे. 'ओम' म्हणजे मी आत्मा आहेच शांत स्वरूप. दुसऱ्या 'ओम शांती'चा अर्थ आहे माझे पिता परमात्मा शांतीचे सागर आहेत आणि तिसऱ्या ओम शांतीचा अर्थ आहे माझे मूळ घर, निवास स्थान शांतीचे धाम शांतीधाम आहे. शांतीधामाची निवासी मी, शांतीच्या पित्याची संतान मी! आणि मी शांतीसाठी याचना करणार? कारण 'स्व'चाच परिचय नाही तिथे या गोष्टीचा परिचय कुठे असणार? त्यामुळे अनाथ मूल याचना करण्याव्यतिरिक्त दुसरं काय करणार?

'ओम शांतीचा स्रोत परमपिता परमात्मा आहे. त्याने आपला स्वधर्म जागृत केला आहे. तेव्हा माझ्या बंधु-भगिनींनो जागे व्हा' परमात्म्याला ओळखा. परमात्म्यासोबत संबंध जोडल्यास शांती दूर नाही. आज स्वतः ईश्वर भारतभूमीवर अवतरित होऊन आपल्या मुलांना म्हणजे सर्व मनुष्य आत्म्यांना श्रेष्ठ ज्ञान प्राप्ती करून म्हणजेच गीतेचे म्हणजेच स्वधर्माचे ज्ञान देऊन एकत्र करण्यासाठी आला आहे.

एकात्मतेसाठी सर्वप्रथम आपला दृष्टीकोन बदलावा लागेल. स्त्री-पुरुष या भानातून थोडं वरती येऊन आपण सर्व परमात्म्याचे संतान आत्मा भाऊ-भाऊ आहोत. हिंदु, मुस्लिम, सिख-ईसाई आपस में है भाई-भाई ही उक्ती केवळ पुस्तकी न राहता तिला प्रात्यक्षिक एकात्मता रूप येईल तेव्हाच समाजात पुन्हा एकात्मता किंवा एका धर्माची स्थापना होईल आणि हे कार्य आपल्यालाच करायचे आहे. मग समाजातील प्रत्येक क्षण आणि प्रत्येक कण शांतीमय होईल.

***

सिरि भारु होई

ब्र.कु. मनोहर, गोरेगाव (प.)

असंख जप असंख भाउ । असंख पूजा असंख तप ताउ ।।...
असंख कहहि सिरि भारु होई – गुरु नानक

गुरू नानक म्हणतात, परमेश्वराच्या आराधनेचे अनेक प्रकार आहेत जप, मंत्र, स्तोत्रे असंख्य प्रकारच्या पूजा-अर्चा, तपश्चरणे आहेत. यातील असंख कहहि सिरि भारु होई ...ही ओळ आपलं लक्ष वेधून घेते! असंख्य असंख्य म्हणताना मनांत गोंधळ निर्माण होतो. डोकं जड होतं. गुरु नानकांच्या या ओळीची पार्श्वभूमी त्यांच्या लहानपणच्या एका घटनेत कदाचित असावी. काय आहे ती गोष्ट पहा.

लहान नानक शाळेत जाऊ लागले. शाळेमधे हा बालक चुपचाप बसलेला असायचा..कोणाशी बोलणं नाही, स्वतःच्याच विचारात मग्न असायचा. शिक्षकांना पण जरा विचित्र वाटायचं!

एकदा अबोल नानकाने शिक्षकांनाच प्रश्न विचारला, 'तुम्ही हे जे सर्व शिकवत आहात त्या शिक्षणाने मला परमेश्वराविषयीचे ज्ञान होईल का? त्या 'एकाची' भेट घडेल का?

ह्या प्रश्नाने शिक्षक गडबडून गेले. इतक्या अल्पवयीन मुलाकडून हा प्रश्न त्यांना अनपेक्षित होता. कसाबसा हसरा चेहरा करुन ते म्हणाले, ''नाही ! तुला ईश्वरी ज्ञान मिळणार नाही ! पण बेटा, तू परमेश्वराव्यतिरिक्त बरंच काही जाणू शकशील!''

गुरू नानक म्हणाले, ''मग मला ईश्वरी ज्ञान द्या बाकीचं सर्व जाणून मी काय करु?

ज्याला जाणल्यावर बाकीचं सर्वच ज्ञात होतं, त्या परमेश्वराला तुम्ही जाणून घेतलं आहे का?''

शिक्षक विचारात पडले. त्यावेळेसचे शिक्षकही तेवढे प्रामाणिक होते. वर्ग संपल्यावर ते नानकांबरोबर त्याच्या घरी गेले. कालू मेहता म्हणजे नानकांच्या वडिलांना प्रांजळपणे सांगितलं, ''क्षमा करा तुमच्या मुलाला मी शिकवू शकणार नाही! यह तो पहले से ही सीखा हुआ हैं। या मुलाच्या प्रश्नांची उत्तरं माझ्याकडे नाहीत!''

''इससे ही हम कुछ सीख ले वही बेहतर हैं ! अहो , ज्या शिक्षणाने मी स्वतः 'ज्ञानी' होऊ शकलो नाही, ते शिक्षण ह्या लहान मुलाला जोर जबरदस्तीने शिकवून आपण काय साध्य करणार आहोत ? उलट ती सर्व शास्त्रं, उपनिषदं. शिकवून आपण खरंतर ह्याच्या डोक्यावरचं ओझंच वाढवणार आहोत!''

बाल नानक 'निराकार ईश्वराची' ओळख करू पाहत होते. नानकदेवांनी म्हटले आहे 'एक ओंकार' म्हणजे परमात्मा निराकार आहे. तसंच त्यांनी 'आत्मा परमात्मा अलग राहे बहुकाल' असंही वर्णन केलं आहे. म्हणजे आत्मा आणि परमात्मा वेगळे आहेत आणि आत्मा म्हणजे परमात्मा नाही.

त्या परमेश्वराचे सत्य रूप कसे आहे? त्याचे नाव काय आहे? त्याचे धाम, त्याची कर्तव्ये काय आहेत? याबाबतचे अचूक आणि संपूर्ण ज्ञान देण्यासाठी परमेश्वराला स्वतःला पृथ्वीवर यावे लागते.तो म्हणतो, माझं नाव 'शिव' असून मी निराकार (मनुष्यदेहाप्रमाणे मला शारीरिक आकार नाही) आहे, मी ज्योतिर्बिंदु स्वरूप आहे. माझे राहण्याचे ठिकाण ह्या पाच तत्वांच्याही पलीकडे जिथे सूर्य-चंद्राचाही प्रकाश पोचू शकत नाही, ज्याला सहावं तत्व म्हटलं आहे,

(पान क्र. २३ वर)



कोविडशी लढताना बाबांची मदत

ब्र.कु. रजनी, पुणे

मंगळवार दि.१६ फेब्रुवारी २०२१ रोजी नेहमीप्रमाणे आम्ही उठलो, माझ्या पतीस बरेच दिवसापासून सर्दी असल्याने ते डॉक्टरकडे जाऊन आले होते, औषध देऊनही सर्दी कमी होत नव्हती, म्हणून ते पुन्हा डॉक्टरकडे जाऊन सल्ला घेऊन आले. डॉक्टरांनी करोना चाचणी करायला सांगितली, आदल्या दोन दिवसापासून मुलाला आणि मलाही ताप आला, म्हणून डॉक्टरांनी मुलालाही चाचणी करायला सांगितली. त्यानुसार ते दोघेही चाचणीनुसार करोनाबाधित निघाले.

मग घरातील आम्हा तिघांनाही म्हणजे मी, माझी मुलगी आणि सून यांची चाचणी केली गेली आणि एकामागून एक आम्ही सर्वजण करोनाबाधित आहोत असं निदर्शनास आलं. हे ऐकताच आमच्या पायाखालची वाळूच सरकली. आम्ही रडकुंडीला आलो, एकमेकाला धीर देत, डॉक्टरांचा सल्ला घेतला, त्यांनी मी, माझे पती आणि मुलगा यांना हॉस्पिटलात भरती व्हायला सांगितले आणि मुलगी आणि सुनेला घरीच क्वारंटाईन (विलगीकरणातच राहायला) व्हायला सांगितले.

आम्ही खासगी रुग्णालयांना बरेच फोन केले; पण खाटा उपलब्ध नाहीत हेच उत्तर कायम येत गेले. मग काय करावे तेच कळेना, शेवटी ओळख काढून हिंजेवडीत विप्रो क्वारंटाईन केंद्रावर गेलो आणि तिथे भरती झालो. उपचार सुरू झाले.

तिसऱ्या दिवशी मुलगी आणि सुनेलाही त्रास होऊ लागल्याने विप्रो येथील डॉक्टरांना विनंती करून त्यांनाही भरती करून घेतलं. अशा तऱ्हेने सर्व कुटुंबच हॉस्पिटल मध्ये भरती झालं.

पाच दिवसानंतर मला जास्त त्रास होऊ लागला, मला उच्च रक्तदाब आणि मधुमेहाचा त्रास आहेच आणि त्यामध्ये भर म्हणून श्वासोच्छ्वासाचा त्रास होऊ लागल्याने ऑक्सिजन लावावा लागला, आठव्या दिवशी मला जास्तच त्रास होऊ लागल्याने डॉक्टरांनी मला अतिदक्षता विभाग असलेल्या ठिकाणी म्हणजे बाणेर येथील कोविड केंद्रावर हलवले. एकटेपणाची जाणीव फार भयानक असते याचा प्रत्यय आला. एकटीच ॲम्ब्युलन्स मध्ये आणि ऑक्सिजन लावून बाणेरच्या केंद्रावर मला नेण्यात आले. तिथल्या डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची फार धावपळ होताना दिसत होती. येणारे गंभीर रुग्ण, तिथे होणारी सर्वांची धावपळ, व्हेंटिलेटरचा आवाज आणि ते वातावरण पाहून खूपच घाबरले, त्यातच माझी तब्बेत जास्तच खराब झाली, रात्री १२ वाजता मी शिवबाबांची आठवण करत होते. जणू काही बाबांच्या नावाचा धावा केला आणि बाबांना म्हणाले, ''बाबा मला वाचवा...'' तर मला डोळ्यासमोर असं दिसलं – जणू दश भुजाधारी बाबा माझ्या समोर साक्षात उभे आणि बाबा जसं काही माझ्यात बळ भरण्याकरिता म्हणत होते, ''मुली घाबरू नकोस मी आहे ना!'' बाबांनी माझ्या डोक्यावर हात ठेवून बोलल्याचा अनुभव झाला, कानात शब्द गुंजत होते सगळं ठीक होईल, घाबरू नकोस, माझ्याप्रमाणे इतर रुग्णांनाही बाबा जणू काही शक्ती भरत होते. आणि काय आश्चर्य! दुसऱ्या दिवसापासून माझी प्रकृती सुधारू लागली. अति दक्षता विभागातून मला सामान्य कक्षात आणण्यात आले. त्याचबरोबर माझे कुटुंबीयसुद्धा बरे होऊन आता घरी आले. आहेत. आम्हां सगळ्यांना बाबांनीच वाचवले. इतर रुग्णांनाही शिवबाबांची मदत मिळो हीच शुभकामना. धन्यवाद बाबा.

***

महातपस्विनी, ऋषिपुत्री राजयोगिनी दादी बृजशांता

ब्र.कु. हेमंत, शांतीवन, आबू रोड

प्राचीन काळी ऋषीमुनी वनात जाऊन तपस्या करीत. संस्कृत शब्द 'ऋषी' म्हणजे द्रष्टा अर्थात् ''पाहणारा!'' जे गहन तपस्येत तल्लीन होऊन दिव्य दृश्य बघतात ते द्रष्टा! शास्त्रांनुसार देव, दानव व मानव यांपेक्षा ऋषी हे महान दिव्य पुरुष! ऋषींमध्ये देवर्षी, राजर्षी व ब्रह्मर्षी हे तीन प्रकार पडतात. देवर्षीमध्ये 'नारद', राजर्षींमध्ये 'राजा जनक' व ब्रह्मर्षींमध्ये वसिष्ठ, याज्ञवल्क्य हे प्रसिद्ध आहेत. ब्रह्मर्षी म्हणजे ब्रह्मा समान नवसृष्टी निर्माण करणारे! ब्रह्मतत्त्वांत म्हणजे परमधामात मन-बुद्धीद्वारे रमण करणारे!

निराकार शिव परमात्मा रचित गीता ज्ञान यज्ञातील साधक अर्थात् पवित्रतेचे पालन करणारे ब्राह्मणच होत. शिवबाबांच्या ज्ञान यज्ञात आपलं सर्वस्व वाहणाऱ्या ब्रह्मर्षींच्या दीर्घ नामावलीत यज्ञ इतिहासातील स्वर्णिम पृष्ठावरुन कधीही न पुसले जाणारे असे एक अजरामर नाव आहे 'राजयोगिनी दादी बृजशांताजी.'

दादीजींचा लौकिक जन्म सिंध हैदराबाद येथे सन १९२३ मध्ये एका धनाढ्य कुटुंबात झाला. आई 'लीलावती' व वडील 'मुलचंद' ह्यांनी त्यांच्या मुलीच्या गुणा रुपाला साजेसं नाव ठेवलं 'मोतिल' त्यांच्या चेहऱ्यावर पवित्रतेची चमक व परमात्म प्राप्तीचा आनंद झळकत असे. तपस्वीनीप्रमाणे शांत व प्रसंगी वज्राप्रमाणे कणखर भासणाऱ्या दादींचा शिवबाबांनी अलौकिक नाव ठेवलं बृजशांता। ब्रह्माबाबा प्रेमाने त्यांना 'ऋषीपुत्री' संबोधत. बाबा म्हणत, ''तू ऋषीपुत्री शिवाची शक्तीच आहेस, म्हणून वेणी न घालता तपस्वी ऋषीप्रमाणे केस मोकळे ठेव.''

सन १९३७ साली सिंध हैद्राबादेत ओम मंडळींबद्दल खूप उलट-सुलट बातम्या चर्चिल्या जात होत्या. 'यशोदा निवास' या निवासस्थानी दादा लेखराज हे गीतेवर प्रवचन करत. ते ऐकण्यासाठी माता व भगिनी जमत असत. दादींची मोठी बहीण 'हरदेवी'ही ते प्रवचन ऐकण्यास जायची व घरी येऊन ते ज्ञान सांगत ते ऐकून दादींच्याही मनांत कुतूहल जागे होई. तेव्हा दादींचं वय होतं अवघं तेरा वर्ष! त्या 'तोलाराम गर्ल्स' स्कूलमध्ये शिकत होत्या. त्याकाळी इयत्ता सातवीमध्ये मॅट्रीकची परीक्षा होत असे. दादी इंग्रजी पाचवी इयत्ता पास करून सहावीच्या वर्गात गेल्या होत्या. शाळेला सुट्टी लागली होती. ज्ञानाच्या जिज्ञासेने त्या मोठ्या बहिणीसोबत ओममंडळीत गेल्या. ब्रह्माबाबांनी प्रेमाने जवळ बोलवलं व विचारलं, ''बेटा तू कोण आहेस? कुठून आली आहेस? खरं तर तू एक आत्मा परमेश्वराची संतान आहेस. बेटी तू परमधामातून ह्या सृष्टीरुपी रंगमंचावर आली आहेस. ओम म्हणजे आत्मा आणि मंडळ म्हणजे सारी दुनिया! हे जग एक छोटासा टापू (बेट) आहे.'' अशाप्रकारे बाबांनी परमात्मज्ञानाद्वारे दादींचा बुद्धीरुपी तिसरा नेत्र उघडला. बाबांनी एक सुंदर कविता रचली होती.

''छड देह अभिमान बट योगियों का ज्ञान,
कर गंगा स्नान, बोलो ओम ओम ओम।

भावार्थ : देह अभिमान सोडा व योगेश्वर पित्यापासून ज्ञान घ्या. दादीजी रोज ओममंडळीत जाऊ लागल्या. ज्ञान व प्रभूप्रेमाच्या प्राप्ती पुढे शाळा कॉलेजातील डिग्रीची हौस व विलासी सुखाची स्वप्नं लुप्त झाली.

ह्या ज्ञानयज्ञात अनेक भगिनी-माता तना-मनाने समर्पित झाल्या होत्या. दादीजीसुद्धा रोज ज्ञान ऐकण्यास जात असत.

त्यांची प्रभूप्रेमाची ओढ बघून त्यांना ब्रह्माबाबा पळवून नेतील की काय असा नातेवाईकांचा गैरसमज झाला. दादींचे आजोबा विरोधक होते. त्यांनी दादीजींच्या जाण्या-येण्यावर बंधन घातलं. दादीजींना १८ कुलुपात बंदीस्त केले. स्नानघर, कोळसा घर असं प्रत्येक खोलीतून दुसऱ्या खोलीत जाताना प्रत्येक दरवाज्याला अशी अठरा कुलुपं घातली व त्यावर भरीस भर म्हणून त्या कुठेही जाताना एक पहारेकरी त्यांच्याबरोबर असे. रोज ज्ञान मुरली ऐकण्यास न मिळाल्यामुळे त्यांची अवस्था 'जल बिन मछली' अशी झाली होती. 'कला' नावाची बहीण भाजीवालीच्या वेशात येऊन दादीजींना मुरली देत असे. एकदा घरच्यांनी 'कला'ला ओळखले व पकडलं. दादीजींची ज्ञान मुरली स्थगित झाली. ह्या बंधनातून मुक्त होण्यासाठी दादीजी घरातील खिडकीतून उडी मारुन रेल्वेने तडक कराचीला पोहोचल्या. इकडे वडिलांनी दादीजींच्या नावे 'सर्च वॉरण्ट' काढलं. दादींच्या आई लीलावती ह्या ज्ञानमार्गात होत्या. वडिलांनी आईला सांगितलं, की मी ऑफिसातील एका मुलाच्या लग्नाला जात आहे, दोन दिवसांत परत येईन. पण प्रत्यक्षात एका नामांकित व्यक्तीबरोबर कोर्टाचं वॉरण्ट घेऊन कराचीला गेले. दादीचं वय १६ (१८ पेक्षा कमी) असल्याने कायद्यानुसार कोर्टाने दादीजींना पित्याच्या हवाली केलं व घरी आल्यावर दादीजींनी आईला सर्व वृत्तांत सांगितला.

दादीजींचा परिवार एकत्र कुटुंब पद्धतीचा होता. दादी, हरदेवी दादी, आई लीलावती, काकू क्वीनमदर, चुलत बहीण शील इंद्रा हे सर्व ज्ञानमार्गात तर बाकीचे विरुद्ध पार्टीत. त्यामुळे घरात रोज 'महाभारत' घडत होतं. अखेर 'सत्यमेव जयते' या न्यायाने दादीजी धर्मयुद्ध जिंकल्या व यज्ञात समर्पित झाल्या. १४ वर्षाच्या तपस्येने जीवन भट्टीतील सोन्यासारखं उजळू लागलं होतं. १९४७ मध्ये भारत पाकिस्तान विभाजनानंतर वडील मुंबईला गेले. भारतात यज्ञ स्थलांतरित झाल्यावर अन्य दादींप्रमाणे सेवेनिमित्त लंडन काही काळ हाँगकाँग येथे सेवा करून पुणे येथे क्वार्टरगेट सबझोनचा विस्तार करण्यासाठी त्या निमित्त बनल्या. आज क्वार्टरगेट उपक्षेत्राअंतर्गत ९५ सेवाकेंद्र अन् हजारो गीतापाठशाळा आहेत. खानदेशात शहादा, कुसूंबा, साक्री, नंदुरबार, शिरपुर, वळाडी अशी अनेक सेवाकेंद्र उघडली. खानदेशाच्या सीमेला लागून असलेल्या मध्यप्रदेशात पानसामल व गुजरातमध्ये निजर येथेही सेवाकेंद्राची स्थापना केली.

पुणे क्वार्टर गेट येथील पारु (पार्वती) दीदी दादीजींचं वर्णन करताना सांगतात, 'दादीजींचं यज्ञावर प्रेम होतं. सेंटरवर जमा झालेल्या धनराशीतील एक वाटा आधी मधुबनला पाठवत. यज्ञासाठी कोणी चांदीची भांडी, सोनं नाणं दिलं तर त्या विनाविलंब मधुबनला पाठवत. मुरलीच्या तर त्या दिवान्याच होत्या. दिवसातून ४ वेळा मुरली वाचत. त्यांच्या पर्समध्ये सिंधी लिपीतील मुरली नेहमी असे. सेंटरवरील वरिष्ठ अशा दादींनी देह त्यागल्यावर त्यांना मुखाग्नी देताना माझ्या नेत्रातून प्रेमाश्रू तरळले तेव्हा दादीजी म्हणाल्या, 'पारु शकल ठीक कर.' स्मशानातही मला ज्ञानाचं बळ दिलं. चंद्रमणीदादींसमोर एका व्यक्तीने खूप क्रोध केला तरीही चंद्रमणीदादी शांत होत्या. दादींचं हे उदाहरण देऊन अवस्था एकरस बनवायला सांगत. स्वतःच्या कर्मातून दादीजींनी जगणं शिकवलं व माझं जीवन घडवलं.

साक्री सेवाकेंद्राच्या संचालिका शीला दीदी म्हणतात, 'दादीजी महान तपस्विनी होत्या. योगात त्यांचे नेत्र स्थिर असत. आई व बहीण सोबत राहूनही त्यांच्या नात्यात अलौकिकता होती. लौकिक घरी श्रीमंतीत वाढल्या तरी इथे पलंग न वापरता आमच्या सोबत जमिनीवर झोपत स्वतः वरिष्ठ असूनही मला सखीसारखे वागवत. एकदा मी रुसले होते. मला त्यांनी प्रेमाने समजावले 'हे बघ ह्या संगमयुगात रुसणं म्हणजे कल्प कल्पांतर स्वतःच्या भाग्यावर रुसणं आहे.' तेव्हापासून माझा रुसण्याच्या संस्कारच नाहीसा झाला. एकदा जेवणात उष्ट टाकल्यावर दादीजी म्हणाल्या, 'हे बघ हे तू स्वतःचं भाग्य फेकून देत आहेस. ज्यांनी ह्या अन्नासाठी दाणा कणा दिला ते तुझ्या भाग्यातून कापले जाईल.'

(पान क्र. २३ वर)

कर्मसिद्धांत

ब्र.कु. अनिता, संगमनेर

लिओ टॉलस्टॉयची ही एक अतिशय प्रसिद्ध व सुरस कथा आहे!

एकदा यमदेवाने आपल्या एका दूताला पृथ्वीवर पाठवलं. एका स्त्रीच्या मृत्यूनंतरच्या गतीचं कार्य त्याच्यावर सोपवलं होतं. तो तिथे पोहोचला; पण थोडा संभ्रमात पडला. तिला तीळं म्हणजे तीन मुली होत्या. बाळं रडत होती..त्यांचे वडील तर खूप आधीच देवाघरी गेले होते आणि आता आईविना त्या मुली अनाथ होणार, हे सर्व बघून देवदूताला दया आली. तो त्या स्त्रीला (खरंतर त्या आत्म्याला) आपल्याबरोबर न घेता रिकाम्या हाताने यमदेवाकडे आला व सर्व परिस्थिती सांगितली. ते ऐकून यमराज भडकले, ''तू काय स्वतःला परमेश्वर समजतोस का? प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धा निसर्गनियमांमधे हस्तक्षेप करत नाही मग तू कोण एवढा मोठा लागून गेलास? त्या स्त्रीचा मृत्यू तर अटळ आहे. मी दुसऱ्या दूताकरवी ते काम करीनच; पण आता तुला मात्र आज्ञाभंगाचं फलित म्हणून शिक्षा भोगण्यासाठी पृथ्वीवर जावं लागेल व जोपर्यंत तू स्वतः तीनवेळा मूर्खपणा करत नाहीस व स्वतःच्या मूर्खपणावर स्वतःच हसणार नाहीस तोपर्यंत तुझी सुटका होणार नाही. तू इथे परत येऊ शकणार नाहीस.'' दुसऱ्याच्या चुका व मूर्खपणावर तर अहंकारी माणूस हसतो; पण स्वतःच्या मूर्खपणावर हसण्यासाठी तेवढं धैर्य लागतं. दूत शिक्षा भोगण्यास तयार होता. यमलोकातून त्याला जमिनीवर वस्त्रहीन अवस्थेत हाकलल गेलं. त्याच सुमारास समोरून एक चर्मकार येत होता.रशियातले थंडीचे दिवस सुरू होणारच होते म्हणून आपल्या बायको व मुलांसाठी गरम कोट व ब्लँकेटस् खरेदी करण्यासाठी तो बाजारात चालला होता.त्याने साधारण देहांत असलेल्या वस्त्रहीन देवदूताला बघितलं. त्याला दया आली व त्याने घरातील लोकांऐवजी ह्या माणसासाठीच कपडे, ब्लँकेट वगैरे खरेदी केलं. नंतर अचानक त्या चर्मकाराला काय वाटलं कोण जाणे, तो दूताला म्हणाला, अशा घरदार नसलेल्या अवस्थेत तू कसा काय जगणार आहेस? माझ्या घरी चल काही दिवस...! माझी पत्नी तुला बघून चिडचिड करेल; पण तू मनाला लावून घेऊ नकोस. ती मनाने चांगली आहे; पण जरा त्रागा करते एवढंच. काही दिवसांनी सगळं ठीक होईल. त्या दूताला घेऊन तो आपल्या घरी गेला. त्या चर्मकारालाही माहीत नव्हतं, आपण कुठल्या व्यक्तीला घरी नेत आहोत ना त्या पत्नीला समजलं आपल्या घरी या मनुष्याच्या रुपात कोण आलाय ! त्याची ओळख करून देत चर्मकाराने सांगितलं हा काही दिवस आपल्याकडेच राहणार आहे. घरी आलेल्या आगंतुकाला बघून पत्नीचं माथं भडकलं, त्याच्या समोरच ती म्हणाली, ''इथं आपल्याला गिळायला अन्न नाही अन् त्यात भरीस भर म्हणून ही ब्याद का मागे लावून घेतलीय?''

...आणि देवदूत पहिल्यांदा हसला. चांभाराला आश्चर्य वाटलं. आपली बायको एवढं कठोर बोलली आणि चक्क हा हसतो! त्यावर देवदूत म्हणाला, ''अजून दोनदा मी असाच गूढ हसेन मग बोलू.'' हा सामान्य मानव नसून देवदूत आहे, हे तिला माहीत असण्याचं काहीच कारण नव्हतं. त्याच्या पदस्पर्शाने पुढील काही दिवसांतच त्यांचं भाग्य उजळणार होतं. मनुष्याचे विचार किती सीमित व स्वार्थी असतात ना? खुज्या मनोवृत्तीची माणसे आपल्या

पायाखालची सावलीच जेमतेम पाहू शकतात. दूरवरचे पाहायचे तर तशी उंची गाठणं आवश्यक असते. पण त्याची सुतराम कल्पनाही येणं शक्य नव्हतं. आपल्या मुलांसाठी गरम कोट व ब्लँकेट न घेतल्याचं तिला दुःख होतं.

सात दिवसांतच देवदूत चांभाराचं सर्व कसब शिकला व देवदूताने बनविलेले चामड्याचे बूट एवढे लोकप्रिय झाले, की जो-तो त्यांची स्तुती करू लागला. देवदूताच्या कौशल्यामुळे हळूहळू तो चांभार धनवान होऊ लागला. या चांभारासारखे बूट कोणीही बनवू शकत नाही अशी अवघ्या सहा महिन्यांत त्याची ख्याती पसरली. अन्य देशांतील राजांचेही जोड बनविण्याचे काम चांभाराकडे येऊ लागले व घरामधे अपार संपत्ती येऊ लागली.

दिवस-महिने-वर्ष पुढे सरकत होती.

एकदा असं झालं. सम्राटाचा एक अधिकारी आला. चांभाराकडे कातडं सोपवलं व म्हणाला हे खूप दुर्मीळ व महागडं कातडं आहे. तुझं काम सम्राटांना पसंत आहे म्हणून सम्राटांनी तुझ्याकडे हे कातडं आपले बूट बनवण्यासाठी दिलं आहे. चूक झाली तर सम्राट क्षमा करणार नाहीत. लक्षात ठेव, सम्राटाच्या पायाकरिता बूट बनवायचे आहेत स्लीपर नाही! अधिकाऱ्याने स्पष्टपणे खडसावले..! (रशियामधे मृत व्यक्तीला स्लीपर घालून स्मशानांत नेण्याची प्रथा होती)

चांभारानेसुद्धा देवदूताला बजावलं हे बघ, सम्राटांच्या पायाकरिता या दुर्मीळ कातड्याचे बूट बनवायचे आहेत स्लीपर नव्हे व कातडंसुद्धा बूटाच्या मापापुरतेच आहे..काही गडबड झाली तर नसती आफत ओढवेल.

एवढं निक्षून सांगूनही देवदूताने स्लीपरच बनवल्या. चांभाराने त्या बघितल्यावर तो इतका क्रोधीत झाला व देवदूताला काठीने झोडपून काढले.. तू मला फासावर लटकवणार आहेस का? इतके वेळा बजावले तरी तू स्लीपर का बनवल्यास?

देवदूत जोरजोरात हसू लागला! तेवढ्यात सम्राटाचा अधिकारी आला व म्हणाला, ''बूट नको स्लीपर बनव. आपल्या सम्राटांना कालच देवाज्ञा झाली आहे उद्या त्यांचा अंत्यविधी आहे.''

कालगती काय असते पहा, भविष्य अज्ञात असतं व आपण गतकाळातील अनुभवांवर जगत असतो. काल सम्राट असताना बूटासाठी आटापिटा होता, आज स्लीपरची गरज निर्माण झाली. उद्या स्लीपर घालायला पायही नाही राहणार, देहच नष्ट होणार हे शाश्वत सत्य प्रत्येकाच्या आयुष्यात आहे.

चांभाराने लगेच त्या स्लीपर दिल्या. अधिकारी निघून गेल्यावर चांभार देवदूताच्या पाया पडून क्षमा मागू लागला. मी तुला उगाच मारले. देवदूताने शांतपणे सांगितलं, ''अरे, ह्यात तुझा काहीही दोष नाही. मी माझ्या कर्माची शिक्षा भोगतोय.'' दुसऱ्यांदा देवदूत हसला. भविष्य अज्ञात असतं व आपण विनाशी इच्छांच्या मागे धावत सुटतो. साध्या घटनांमधेसुद्धा चिडचिड, त्रागा करत बसतो. मृत्यूघटिका समीप असताना जीवनाचे गणित बांधत रहातो व नियतीच्या मनात काहीतरी वेगळंच असतं. कदाचित यामुळे सुभाषितकारांनी म्हटले असावे -

गृहितेव केशेषु मृत्यूनां धर्ममाचरेत्

देवदूताला कुतूहल होतं त्या तीन अनाथ मुलींचं भवितव्य काय?

काही दिवसांतच चांभाराकडे तिसरी घटना घडली. एका धनाढ्य घराण्यातील वृद्ध स्त्री आली व बरोबर तीन सुंदर युवती आल्या. तीनही युवतींचे लग्न ठरलं होतं त्यांच्यासाठी उत्तम चढावांचे जोड बनवून हवे होते. देवदूताने तीन मुलींना पाहताक्षणीच ओळखलं ह्याच त्या तीन मुली होत्या. त्याला वाटलं ज्यांच्या मृतप्राय आईकडे बघून मला दया आली व विधिलिखितात बदल करायचा प्रयत्न केल्याने मी आज शिक्षा भोगत आहे. त्या तिघीजणी अतिशय सुंदर व समृद्ध दिसत होत्या. देवदूताला उत्सुकता वाटली, त्यांच्याबरोबर जी वृद्धा आली आहे ती कोण आहे? वृद्ध स्त्रीला विचारल्यावर तिने सांगायला सुरुवात केली. ह्या मुली माझ्या समोरच रहात होत्या. ह्यांची आई लहानपणीच देवाघरी गेली. ती अतिशय दारिद्र्यात दिवस कंठत होती.

तिच्या पश्चात् ह्या मुलींचं कसं होणार? मला दया आली व ह्या तिघींना मी दत्तक घेतलं, मलाही संतान नव्हती. मी स्वतःच्या मुलींप्रमाणे ह्यांचं पालनपोषण केलं व आता सम्राटाच्या राजपुत्रांशी ह्या तिघीजणी विवाहबद्ध होणार आहेत. हे ऐकल्यावर 'देवदूत तिसऱ्यांदा व शेवटचं हसला'. त्याने चांभाराला स्वतःच्या हसण्याचं कारण सांगायला सुरुवात केली.

आज जर त्या तीन मुलींची आई जिवंत असती तर ह्या तिघीजणी दारिद्र्यात खितपत पडल्या असत्या. पण आता आई नसल्याने वृद्ध स्त्रीला दया आली व तिच्या संपत्तीला वारस मिळाला व तिघीजणींनी समृद्धी उपभोगली. तसेच वृद्ध स्त्रीला संतानसुख मिळालं !

देवदूताने सांगितलं, ''मी चुकत होतो. नियती सूत्रबद्ध व योग्य आहे. तिच्या कार्यामधे मी हस्तक्षेप केल्याने मला जी शिक्षा मिळाली होती, ती आज पूर्ण झाली, आता मी तुझा निरोप घेतो.

एवढं बोलून तो देवदूत पाहता-पाहता तिथून अदृश्य झाला.

कथा जरी इथे संपली असली तरी त्याचा सारांश मात्र कायम आपल्याबरोबर ठेवायचा आहे.

एकंदरीत सध्याचं वातावरण व काहींचे अपमृत्यू / जीवघात बघून बऱ्याच जणांच्या मनांत हा प्रश्न येतो, इतक्या तरुण वयांत ही व्यक्ती का गेली? त्याच्या पश्चात् त्याच्या कुटुंबांचं / मुलाबाळांचं काय होणार?

काहीजणं तर ह्या घटनांकरता चक्क परमेश्वरालाच दोषी ठरवतात. एखाद्याला जर न्यायचंच होतं तर हॉस्पिटलचा खर्च व इतक्या यातना का दिल्या? ज्या ईश्वराचं वर्णन आपण प्रेमाचा सागर, कृपाळू असं करतो तो आपल्याच मुलांशी असा निष्ठूरपणे का वागेल? मनाला येईल तसं स्वतः वागायचं, वाट्टेल तशा चुका करायच्या व शिक्षा भोगताना मात्र प्रेमळ परमेश्वराला अशी दूषणं द्यायची. कशासाठी?

यावर एकमेव उत्तर म्हणजे कर्मसिद्धांत!

परमेश्वर कर्मामधे कधीही ढवळाढवळ करत नाही; पण कर्मभोगाच्या दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग मात्र सुचवितो. तो म्हणता.. न धरी, शस्त्र करी मी, परि सांगीन गोष्टी युक्तीच्या चार!

***

(पान क्र. ८ वरून)

सद्गतीचेच जग आपल्याला दिसत राहते. या जुन्यापुराण्या अपवित्र जगापासून दूर आपली बुद्धी त्या पवित्र जगात विचरण करत राहते. हे भविष्यातील जग एक कविकल्पना आहे, असे कधीच समजू नका. कारण हे ज्ञान देणारा कोणी मनुष्य नसून स्वतः निराकार सद्गुरु परमात्मा आपल्याला सांगत आहे. हे कधीच विसरू नका. विसरलात, तर मग संशयाला वाव मिळेल. लक्षात असू दे, श्रेष्ठ बनण्याची हीच वेळ आहे. कोणी मृत्यू पावला तर नवीन जन्म घेऊन हे ज्ञान प्राप्त करेल, एवढासुद्धा वेळ आता नाही. आता जन्म घेऊन छोटे बाळ तर ज्ञान घेऊ शकणार नाही. म्हणून बाबा म्हणतात, हा तुमचा अंतिम जन्म आहे. जो कोणी आता मृत्यू पावेल, तो जन्म जरूर घेईल, पण अभ्यासाची हीच वेळ आहे. बाबांनी सांगितले आहेच, की मी वृद्ध शरीरात येतो. त्यांच्याच अनेक जन्मांची ही कहाणी आहे. ह्या सृष्टिरूपी नाटकाचे गुप्त रहस्य नीट जाणून घ्या, तर मग सर्व गोष्टी सहज समजतील. हीच उत्तम पुरुषार्थाची गुरुकिल्ली आहे.

संदर्भ : (ज्ञान वीणा ८/ १०/ ६२)

भावानुवाद : ब्र. कु. विनय, ठाणे (प.)

***

(पान क्र. १२ वरून)

जागरुक राहावे लागते. आपले कर्म व्यर्थच्या यादीत तर येत नाही ना या चिंतेऐवजी प्रत्येक कर्म समर्थ कसे बनवता येईल यावर लक्ष केंद्रित केले तर आपसूकच व्यर्थ समाप्त होईल. परमेश्वराचे श्रेष्ठ मत म्हणजे श्रीमतानुसार मन-बुद्धी चालवली तर स्वाभाविकपणे व्यर्थ कर्माऐवजी समर्थ कर्मेच हातून घडतील यात शंकाच नाही.

***

घे भरारी गगनात

ब्र.कु. जयलक्ष्मी, ठाणे (प.)

निसर्ग रोज काहीतरी नवे घडवत असतो, जुने मोडत असतो. हे सगळं निमूटपणे करत असतो; पण त्यातून काही संदेश देऊ करतो. फक्त आपण त्याकडे डोळस दृष्टीने पहायची आवश्यकता असते. निसर्ग मातृवत प्रेमही करत असतो, शिकवतोसुद्धा.

जीवनाला कुणी खेळ म्हटलं आहे, कुणी यात्रा, तर कुणी म्हणते, 'जीवन म्हणजे रोज नवं शिक्षण देणारी, एक एक अध्याय उलगडत जाणारी गाथा. पावलापावलावर काही ना काही शिकवण प्राप्त होते. एका प्रसिद्ध कवीने छोट्याशा पाखराचा व त्याच्या आईचा संवाद कवितेद्वारे सुंदररीत्या मांडला आहे. ते वाचता वाचतां मला शिवबाबांची व त्यांच्या शिकवणुकीची प्रकर्षाने आठवण झाली. नकळत त्या सगळ्याची सांगड मनांत बसत गेली तीच तुमच्या समोर ठेवत आहे. मूळ काव्य हिंदीत आहे. मी भावानुवाद करायचा प्रयत्न केला आहे. एकेका कडव्यानुसार पाहू.

एक चिमणी आणि तिचं पिल्लू
घरट्यात चिमुकल्या लागे किलबिलू
कुजबूज ऐके पाना पानांची
पुसे आपुल्या मातेला
उडता येई का मजला?
आई म्हणे,'तू सांब भोळा'

अगदी अशाच प्रकारे आपण जेव्हा या ज्ञानमार्गावर पाऊल ठेवतो तेव्हा आपण आध्यात्मिक वयाचा विचार करता छोटेसेच असतो. आत्मा-परमात्म्याचं ज्ञान मिळतं आणि आपण समजतो आपल्याला जीवनकलाच साधली. मात्र एखादी छोटी समस्या आली तरी आपण डगमगू लागतो. आभाळ वाजलं तर ससा पळतो ना तसं पळू लागतो. मग वाटतं बाबाच आपली आई बनून समजावतात, 'अजून खूप पल्ला गाठायचा आहे बाळा.'

या फांदीवरुनी त्या फांदीवर
झोके घेऊ खाली वर कधी शेंड्यावर
कधी सलगी करूनी तळामुळाशी
विचारे आपुल्या माऊलीला
उडता येई का मजला?
आई म्हणे, 'तू सांब भोळा'

आपणही थोडंफार साकार मुरली, अव्यक्त वाणीच्या खोलात शिरू लागतो. थोडाफार योग साधू लागल्यावर आनंदीत होतो. पण बाबा आपल्याला ताळ्यावर आणतात आणि म्हणतात माझ्या 'लाडक्या मुला अजून खूप पल्ला गाठायचा आहे, थोडा धीर धर' धीरापोटी फळे रसाळ गोमटी.

जाणू लागलो कच्ची-पक्की
फळे मधुर, सडा पडला भुईवरती
चिवचिवाट करती सखे सोबती
मी विचारे आईला
'उडता येई का मजला?'
आई म्हणे, 'तू सांब भोळा'

आपण नित्य मुरली ऐकून थोडी बहुत सेवाही करू लागतो. ईश्वरी शाळेतल्या इतरांशी संवाद, अनुभव आणि ज्ञानाची देवाण-घेवाण सुरू होते. अंतःकरणात बाबांची स्मृती घट्ट रुजायला लागते आणि बाबा आपल्याला सांगतात,

''धीरज धर मनुवा धीरज धर.''

या झाडावर कधी त्या तरुवर

उड्या मारतो धरतीवरती
दाणे टिपतो निरखून
मी विचारतो आईला
'उडता येई का मजला?'
आई म्हणे, 'तू सांब भोळा'

स्वतःचं या ईश्वरी मार्गात एक अस्तित्वही निर्माण होतं. 'वाहवा' देखील मिळते. त्याचप्रमाणे प्रगती होत असल्याच्या खुणाही जाणवू लागतात. मधुबनला जाऊन सेवा करणे, अनुभवाच्या आणि परिचयाच्या कक्षाही रुंदावतात आणि बाबा म्हणतात, ''अभी दिल्ली दूर हैं, हमे उन राहों पर चलना हैं जहाँ गिरना और संभलना हैं।''

गिरक्या घेतो निळ्या गगनात
नवी क्षितिजे, आता न बंधनात
हुंकार उमटे माझ्या मनांत
मी विचारे आईला
'उडता येई का मजला?
आई म्हणे हसूनि
'हो रे माझ्या पिल्ला!
बळ भरले तुझ्या पंखांत
मावेना तू या नेत्रात
घे भरारी आज गगनात
घे भरारी आज गगनात'

पुरुषार्थ करता करता आपल्यालाही साकार बाबांप्रमाणे फरिश्ता म्हणजेच देवदूताची स्थिती गाठायची आहे. ज्ञान-योगाच्या पंखात इतके बळ भरायचे आहे, जेणे करून बाबांनी इशारा केला की देहरूपी घरट्यातून भेट ब्रह्मांडापर्यंत जाता आलं पाहिजे. तेव्हाच बाबा म्हणतील, ''शाब्बास रे माझ्या मुला. माझ्या शिकवणुकीचं सार्थक केलंस, माझं नाव राखलंस. तूच माझा खरा वारसदार, तुला देतो अष्टरत्नाचा अधिकार, घे भरारी गगनात.

हीच स्थिती आपल्याला सगळ्यांना गाठायची आहे त्याकरिता मनापासून शुभेच्छा!

***

(पान क्र. १५ वरून)

त्या परमधामामधे मी निवास करतो, माझी पृथ्वीवर येण्याची वेळ कलियुगाचा अंत व सत्ययुगाच्या प्रारंभाच्या संगमावर आहे. मी स्वतः अवतरित होऊन मनुष्यात्म्याला देवात्मा बनवण्याचे ज्ञान देतो. कलियुगरूपी नरकाला सत्ययुगरूपी स्वर्गात रूपांतरित करणे हे माझं कर्तव्य आहे. याप्रकारे तो स्वतः येऊन आपला परिचय देतो.

'अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः' (गीता - अ. ७, श्लोक २४) या वचनानुसार अव्यक्त अशा परमात्म्याच्या रूपास मूढ लोक जाणू शकत नाहीत.

परमेश्वराच्या सत्य परिचयामुळे कर्मांच्या ओझ्यापासून मुक्त कसे व्हायचे ते आपण साधू शकतो. डोक्यावरचं ओझं हलकं करू शकतो.

असा अव्यक्त परमात्मा स्वतः सृष्टीवर येऊन आपले कार्य करत आहे. ज्यांना या कार्याची अधिक माहिती घ्यायची आहे, त्यांनी जवळच्या सेवाकेंद्रावर अधिक माहिती घ्यावी.

***

(पान क्र. १८ वरून)

अशा ह्या दादी बृजशांता तपोनिष्ठ साधिका होत्या म्हणूनच की काय बाबांनी त्यांना कल्पवृक्षाच्या चित्रांत अष्टरत्नांमध्ये स्थान दिलं. दादीजींनी ३ जून २०१२ ला शरीर सोडले. आजही त्या ब्रह्मावत्सांना कल्पवृक्षाची मूळं बनून प्रेमाचं पाणी व शक्तीचा खुराक देत आहेत. मातेश्वरी जगदंबा यांच्याकडून मिळालेल्या संगोपनाची परतफेड म्हणून की काय दादी बृजशांता यांनीही निर्वाणासाठी जून महिना निवडला. अशा तपस्वीमूर्त दादींना ३ जून ह्या स्मृतीदिनानिमित्त आमुचे शत् शत् नमन!

***

माझा गुलजार दादीजींशी स्नेहबंध

ब्र.कु. दत्ता, शांतीवन, आबू रोड

काही दिवसांपूर्वी दादी हृदयमोहिनी (गुलजार दादीजी) अव्यक्त झाल्या. राजयोगिनी, तपस्विनी सहजयोगिनी अशी अनेक विशेषणे त्यांच्या बाबतीत सार्थ ठरतात. अव्यक्त बापदादांच्या माध्यम म्हणून त्यांनी जी अलौकिक भूमिका गेली इतकी वर्षे बजावली त्याला तोड नाही. वयाच्या नवव्या वर्षी १९३७ साली त्यांचा आध्यात्मिक प्रवास सुरू झाला आणि त्या सहजसिद्ध साधिका म्हणून या ईश्वरी ज्ञानयज्ञात सर्वपरिचित झाल्या. सुरुवातीपासून अंतर्मुख स्वभावाच्या दादीजींनी आपल्या वाणीचा वापर अगदी आवश्यक तितकाच केला त्यामुळे त्यांना जणू वाचासिद्धीचे वरदानच लाभले होते. १९६९ साली ब्रह्माबाबा अव्यक्त झाले आणि त्यानंतर अव्यक्त बापदादा दादीजींच्या माध्यमाद्वारे सर्वांना लाभान्वित करत होते. शांतिवनात मीही त्या अव्यक्त संगोपनातच आध्यात्मिक दृष्ट्या मोठा झालो. २००७ साली प्रकाशमणी दादीजींनंतर जानकी दादीजी आणि गुलजार दादीजी मिळून ईश्वरी यज्ञाचा कार्यभार सांभाळण्यास निमित्त बनल्या. अशा महान व्यक्तीच्या सान्निध्यात मलाही काही काळ घालवायला मिळाला, त्यांच्या सेवेत मी जे सुंदर क्षण घालवले त्यातील मोजके अनुभव देत आहे.

१९९५ साली मला शांतिवनच्या दादी किचनमध्ये सेवा मिळाली. मुन्नीदीदी आणि मोहिनीदीदी यांच्या मार्गदर्शनाखाली मी अनेक गोष्टी शिकत गेलो आणि सर्व दादींच्या सहवासाचा लाभ मिळत गेला. एकदा माझी इतर काही सेवा साथीदारांसोबत कुरबूर झाली. त्याच दिवशी अव्यक्त बापदादांचे अवतरण होते. मी अव्यक्त बापदादांच्या समोर काही काळ बसलो आणि नंतर माझ्या खोलीत निघून गेलो, इतका मी नाराज झालो होतो. बाबांच्या अवतरणाच्या दुसऱ्या दिवशी त्या बरेचदा थोड्या उशिरानेच न्याहारीस येत तशा आल्या. त्यांनी मला बोलावणे पाठवले. मी त्यांच्या समोर हजर झालो. बाबांना दाखवलेल्या नैवेद्यातील पदार्थ मूठ मूठ भरून सगळ्यांना वाटत होत्या. त्यात माझी पाळी आल्यावर मला म्हणाल्या, 'आमचा हा दत्ताभाऊ कधीही कुणावर नाराज होत नाही. सदैव एकरस, अचल, एक्युरेट असतो. सदैव आनंदी राहून दुसऱ्यांची सेवा करतो आणि अनेकांचे आशीर्वाद घेतो.' नेमकी माझ्या मनातील गोष्ट ओळखून मला उभारी दिली त्यांनी. माझ्या मनातील नाराजीचे मळभ इतक्या सहजपणे त्यांनी दूर केले ते आज अविस्मरणीय झाले.

असाच अजून एक प्रसंग. दादीजी म्हणजे ममतामयी मूर्ती होत्या. बाबांची या वैश्विक नाटकाविषयीची शिकवण 'नथिंग न्यू' त्यांच्या रोमारोमात भिनली होती. मी ज्या ज्या वेळी दादीजींना भेटलो त्या त्या वेळी त्यांच्या शक्तिशाली आत्मिक दृष्टीने मी भरून पावलो. एकदा मी प्रकाशमणी पार्कमध्ये काही ब्रह्मावत्सांसोबत ज्ञानचर्चा करत होतो. दादीजी तिथे सहज फेरफटका मारत होत्या. मला पाहून त्यांनी आम्हां सगळ्या मंडळींना बोलावले आणि यज्ञप्रसाद (टोली) दिला व स्नेहार्द्र दृष्टीही दिली. माझ्याकडे बघून त्या म्हणाल्या, हे भाऊ म्हणजे आमची भोली दादी आहे (साकारबाबांच्या काळात भोली दादी स्वयंपाकघर सांभाळायच्या.)

अशा अनेक प्रसंगात मला दादीजींकडून वेगवेगळी वरदाने प्राप्त झाली आणि मी खऱ्या अर्थाने तृप्त झालो. त्यांच्याकडून मिळालेल्या ज्ञानयोगाच्या प्रेरणेचा आधार घेऊन मीही माझी साधना वाढवीत आहे. त्यांच्यासारख्या महान व्यक्तींच्या विषयी जितकं बोलावं तितकं थोडंच आहे.

दादीजींना हृदयापासून श्रद्धांजली व कोटी कोटी वंदन.

भारतीय संस्कृती आणि संस्कार

ब्र.कु. रामकृष्ण, वाशिम

भारताला अनेक शतकांची समृद्ध परंपरा आहे हे सर्व विश्वाला ज्ञात आहे. भारतवर्षातील अनेक संत-महात्म्यांनी भारतीय संस्कृती आणि तत्वज्ञान यांचा परिचय जगाला करून देण्याचे महान कार्य केले आहे. संत ज्ञानेश्वर, संत रामदास यासारख्या संतांनी आपल्या प्रासादिक शब्दांद्वारे तर रामकृष्ण परमहंस आणि विवेकानंद यांनी आपल्या योग साधनेद्वारे तसेच लोकमान्य टिळक, वीर सावरकर, आचार्य विनोबा भावे महात्म्यांनी आपले प्रखर देशप्रेम आणि समर्पणाद्वारे या संस्कृतीमूल्यांची आठवण भारतीय समाज मनाला वेळोवेळी करून दिली आहे.

भारतीय समाज केवळ शरीराकडे न पाहता आत्मा आणि मन यांना महत्व देतो, संस्कृती आणि सुधारणा बाहेर न पाहता अंतरंगात पाहतो, अशा शब्दात भारतीय समाजाचे वर्णन भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी केले आहे. ते स्वतः एक उत्तम शिक्षक होते. त्यांच्या स्मरणार्थ पाच सप्टेंबर हा त्यांचा जन्मदिवस आपल्या देशात 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. 'जर मनुष्याच्या अंतःकरणामध्ये शिक्षणाने माणुसकी आणि शहाणपण निर्माण होत नसेल, तर त्याचे सर्व व्यावसायिक, वैज्ञानिक आणि तांत्रिक विजय निरर्थक ठरतील', असे राधाकृष्णन यांचे मत होते. शिक्षणाचा खरा उद्देश हा विद्यार्थ्यांचा एक व्यक्ती म्हणून सर्वांगीण विकास आहे, असे ते म्हणत.

परंतु आजच्या काळातला सुशिक्षित मनुष्य हा सुसंकृत असेलच असे नाही. इंग्रजी भाषेत सुशिक्षित यासाठी Educated असा शब्द आहे. या Education शब्दाच्या नऊ अक्षरांनी सुरु होणारी नऊ मूल्यांची नावे इंग्रजी भाषेत अशाप्रकारे सांगता येतील. सुसंस्कृत माणसात हे सर्व गुण असणे अपेक्षित आहे.

E - Etiquette (शिष्टाचार) : सर्वांशी नम्रतेने सभ्यतेने वागणे

D - Discipline (शिस्त) : बाह्य शिस्तीबरोबर आंतरिक शिस्त अर्थात विचार, उच्चार आणि आचाराची शिस्त पाळणे.

U - Universal brotherhood (विश्वबंधुत्व)

C - Creativity (सर्जनशीलता)

A - Awareness (जागृती)

T - Transformation (परिवर्तन)

I - Integrity (एकात्मता)

O - Optimist (आशावादी)

N - Nobility (उदात्तपणा)

वास्तविक पाहता मानवी जीवनात सुसंस्काराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आजच्या युवकांमध्ये विद्यार्थीदशेपासूनच या सुसंस्कारांची आवश्यकता समजून शासनाने शैक्षणिक अभ्यासक्रमात नैतिक मूल्य शिक्षणाला स्थान दिले आहे, परंतु आध्यात्मिक शिक्षणाला स्थान दिले नाही. वास्तविक आध्यात्मिक ज्ञान हा नैतिक मूल्यांचा पाया आहे. सध्या कार्यरत शिक्षकांनी नैतिक मूल्ये समाजात रुजवण्याचा आटोकाट प्रयत्न केला तरी सुद्धा जगाची नैतिक दृष्टीने अधोगतीच झालेली दिसून येते. आध्यात्मिक ज्ञानाविना नैतिकमूल्य शिक्षण हे पांगळे आहे. हे याचे कारण आहे. 'सा विद्या या विमुक्तये' अर्थात, जी विद्या जीवनमुक्ती मिळवून देते, जीवन पवित्र सुखशांतिमय बनविते तसेच जीवनातील समस्या-संकटे निवारण्याची क्षमता देते, तीच खरी विद्या होय.

अनेक महान द्रष्ट्या महात्म्यांनी वेळोवेळी सुसंस्कार घडवण्याचे शिक्षण कार्य केले. तसेच, किंबहुना त्याहून अधिक धर्मस्थापकांनी केले. यासर्वांहूनही आधी मानव जातीचे आदि पिता किंवा आदि स्थापक प्रजापिता ब्रह्मा होऊन गेले, ज्यांना काही धर्म ब्रह्मदेव, आदम, ऍडम या नावांनी स्मरतात. परंतु या सर्वांहूनही महान शिक्षक तर निराकार ज्योति स्वरूप परमात्माच आहे. त्यानेच ब्रह्मा वा ऍडम यांना ज्ञान दिले आणि त्यांच्याद्वारे इतरांनाही दिले. त्या परमशिक्षकाला शिव, ईश्वर, गॉड, अल्लाह, वाहे गुरु, जेहोवा इ. नावाने स्मरतात. परमात्म्याने दिलेल्या शिक्षणाने अर्थात् ज्ञानाने सर्वांचे कल्याण करण्याची आज पुन्हा आवश्यकता आहे. परमशिक्षकाद्वारे दिले जाणारे हे ज्ञान आणि सहज राजयोगाचे शिक्षण यामुळे मनुष्याचे देव आत्मा अर्थात् संपूर्ण मानवात परिवर्तन होते. देवी-देवता अर्थात ज्यांच्या व्यक्तिमत्वातील पवित्रता, शांती, मधुरता, अशा अनेक दिव्य गुणांचा आणि नैतिक मूल्यांचे आजही सर्वदूर स्मरण आणि गायन होते, असे दिव्य गुणांनी युक्त मनुष्य घडविण्याचे कार्य परमात्म्याने स्थापन केलेल्या ब्रह्माकुमारीज संस्थेद्वारे चालू आहे. या सर्वोच्च शिक्षणाचे तीन मुख्य उद्देशआहेत (१) देह आणि देहावर आधारलेले सर्व धर्म विसरून स्वतःला आत्मा समजा. (२) सर्वधर्मीय आत्म्यांचा एक परम पित्याचे स्मरण करा. (३) आत्म्याचा खरा स्वधर्म पवित्रता, सुख आणि शांती प्राप्त करा. त्याची प्राप्ती करणे हेच या शिक्षणाचे मूळ उद्देश्य आहे.

आध्यात्मिक ज्ञान आणि आत्मनिष्ठाच नैतिक मूल्यांना बळ देत असते. वर उल्लेखलेल्या सुसंस्कृत माणसाच्या नऊ गुणांपैकी काही गुण समजून घेणे आणि धारण करणे हे आपल्याला केवळ आध्यात्मिक ज्ञानाच्या आधारे शक्य आहे. खाली दिलेल्या उदाहरणावरून हे स्पष्ट होते. उदा. विश्वबंधुत्वाची भावना. परमात्म्याचा आपल्याशी असलेला संबंध जाणून घेतल्यास विश्वबंधुत्वाची भावना आपोआप जागृत होते. आपण सर्व आत्मिकदृष्ट्या एक परमात्म्याची रचना आहोत, आत्मिक दृष्ट्या भाऊ आहोत हे मानावे लागेल; याशिवाय जगातील सर्व लोकांत बंधुत्वाच्या संबंधाला कोणताही आधार नाही. तसेच उत्कृष्ट नैतिकतेला पाप-पुण्याचे आणि कर्मफलाचे ज्ञान हा तात्त्विक आधार आणि तशी मनाची बैठक असली तर सत्कर्माना पुष्टी मिळणे सोपे जाईल. कर्माचे फळ जरी या जन्मी मिळाले नाही तरी पुढल्या जन्मी ते अवश्य मिळते. याचे मुख्य कारण म्हणजे आत्मा ही अनादि, अविनाशी, अभौतिक चैतन्य शक्ती असून ती देह सोडल्यानंतर देखील अस्तित्वात असते आणि संस्कार व कर्मबंधन सोबत घेऊन दुसरा देह धारण करते. यासाठी कर्म-सिद्धांताचे गुह्य ज्ञान आवश्यक आहे. परामानस शास्त्राला देखील आध्यात्मिक ज्ञानाचे अस्तित्व मानावे लागले, कारण त्याशिवाय जुळ्या मुलांच्या स्वभाव व संस्कारातील फरक किंवा पूर्वजन्माची अचूक स्मृती असणारी मुले यांचे समाधानकारकरीत्या स्पष्टीकरण देता येणार नाही.

परमात्म ज्ञानाच्या आधारे प्रत्येक कर्म जाणीवपूर्वक केल्याने निकृष्टाला श्रेष्ठ बनविण्याची सर्जनशीलता अंगी येते. याचबरोबर जागृती म्हणजे काय, transformation अर्थात् मनोपरिवर्तन कशा प्रकारे होऊ शकते, मनुष्य आशावादी आणि उदात्त होण्यात परमात्म ज्ञानाची भूमिका कशी आहे, या सर्व गोष्टी आपण पुढील लेखात पाहणार आहोत.

संस्कृती म्हणजे विकृतीपासून मुक्ती, नित्य निरामय अशी प्रकृती. जसे भूक लागलेली असताना जेवणे ही प्रकृती. भूक लागलेली नसतांना जेवणे ही विकृती आणि भूक लागलेली असतानादेखील आपल्या जेवणातील अन्न भुकेल्याला जेवू घालणे ही आहे संस्कृती. ही बाब सर्वश्रेष्ठ आहे. चारित्र्याने चारित्र्य घडविणे हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. भारतीय संस्कृती ही एक सर्वश्रेष्ठ संस्कृती आहे. आध्यात्मिक ज्ञान-योगामुळेच भारत देश जगात श्रेष्ठ आहे. परम शिक्षक शिव परमात्म्याने दिलेल्या या अमूल्य ज्ञानाचा परिचय आपण पुढील लेखात करून घेणार आहोत. (क्रमशः)

***

मना सज्जना...

ब्र.कु. चंद्रशेखर, बी.के. कॉलोनी, आबू रोड

मन ही अतिशय सुंदर गोष्ट किंवा सूक्ष्म कर्मेंद्रिय आहे जी मानवाला मानव बनवते. मानवी मनाचे अनेक कंगोरे आहेत. मनांत अनेक भाव-भावना, विचार-अविचार, कल्पना-संकल्पना, शोध-आविष्कार, जाणीवा-संवेदना, विश्वास-अविश्वास उगम पावतात. अशा मनाचा ठाव घेणे हा अनेकांसाठी जिव्हाळ्याचा विषय होऊ शकतो. जीवनामध्ये घडणाऱ्या प्रत्येक घटनेचे मूळ हे मनातील आंदोलनामध्ये आहे. मन हे स्वभावतः चंचल असते. तर मनच सर्वात जास्त क्रियाशील राहून सतत विचारांची निर्मिती करीत राहते.

सर्वसाधारणपणे दर मिनिटाला म्हणजेच ६० सेकंदांना अंदाजे २० विचार तर १ तासाला १२०० विचार व २४ तासांमध्ये अर्थात एका दिवसात २८,८०० विचार उत्पन्न होत असतात. हे सर्व निष्कर्ष अभ्यासाअंती काढले आहेत. म्हणजे आपले मन दिवसाकाठी केवढे काम करते. अशा या मनाला सांभाळले तर तेच सुमन बनून सुगंध देते. किंवा त्याला नाही सांभाळले तर तेच मन आपल्याच वैऱ्याचे कामही करते. म्हणून समर्थ रामदास स्वामींनी या मनाला भक्तीकडे वळवण्यासाठी मनाचे श्लोक लिहिले. त्यांनी मनाला सज्जन म्हटले आहे. 'मना सज्जना भक्तिपंथेचि जावे... म्हणजे मनाला आंजारून गोंजारून चांगल्या गोष्टींकडे वळविण्यासाठी ते श्लोक रचले.

हजारो विचारांचे उत्पादन करणारी मनाची ही अद्भुत कंपनी आहे. या कंपनीमध्ये जर योग्य योजना असेल तर तीच विधायक कार्य करून दाखवेल. मन हे आत्म्याचे असे आज्ञाधारक इंद्रिय आहे. त्याला जी आज्ञा देऊ ते करून दाखवू शकते मात्र आज्ञा करणारा शक्तिशाली हवा. या मनामध्ये नकारात्मक विचारांचा भरणा अनेक प्रसंगी होत असतो. यावर उपाय म्हणून जर आपण लक्ष दिले तर सकारात्मक विचार आपल्या मनात रेंगाळतील आणि आपण त्यावर आपली मनःस्थिती बनवू शकतो. या मनःस्थितीचा बरा वाईट परिणाम आपल्या संपूर्ण जीवनावर दिसून येतो. जीवनातील प्रत्येक घटनेत आपली मनोवृत्ती दिसून येते ती एकेका विचाराने तयार झालेली असते. आपण ग्लास अर्धा भरलेला किंवा ग्लास अर्धा रिकामा हा दृष्टीकोन आजूबाजूच्या अनेक व्यक्तिमत्त्वांमध्ये पाहतो. तसेच आणखी एक विचित्र दृष्टीकोन सध्या आपण पाहतो. काय ते या उदाहरणावरून पहा.

एकदा एक प्रोफेसर क्लासरूम मध्ये मुलांच्या समोर अर्धा पाण्याने भरलेला ग्लास घेऊन आले. सर्वांना तो दाखवून विचारले हे काय आहे ? तेव्हा सर्वांनी नेहमीचे उत्तर दिले हा नकारात्मक व सकारात्मक दृष्टीकोण आहे. तेव्हा प्रोफेसरने विचारले, ह्या ग्लासचे वजन किती असेल ? काही जण म्हणाले १०० ग्रॅम काही जण म्हणाले १५० ग्रॅम तर काही जण म्हणाले २५० ग्रॅम तेव्हा प्रोफेसर म्हणाले, हा ग्लास २ मिनिटे हातात धरून ठेवला तर त्याचे वजन किती भासेल व १५ मिनिटे धरून ठेवले तर किती भासेल व १ तास धरूनच ठेवले तर एखादवेळी ते धरून ठेवणे कठीण होऊन बसेल.

अशा या पाण्याच्या ग्लास प्रमाणे मनामध्येही आपण अशा अनेक गोष्टी, आठवणी धरून ठेवतो आणि त्याही काही मिनिटे, काही तास नव्हे तर अनेक दिवस अनेक रात्री अनेक महिने अनेक वर्षे आपण न भावलेल्या त्रासदायक आठवणी धरून ठेवतो. आणि त्याचा भार सांभाळताना

आपले हलके फुलके मन मणाच्या ओझ्याने जड वाटू लागते.

अशा मनाला हलके ठेवण्यासाठी रोज त्यामध्ये साठलेले नकारात्मक विचार काढून ते स्वच्छ करावे लागेल. तेथे आत्मदीप जगवावा लागेल आणि सर्व जडशीळ वाटणाऱ्या आठवणींना नष्ट करण्यासाठी स्वतः चे ध्येय चित्ररूपात पहावे लागेल.

चला प्रफुल्लित करणाऱ्या स्मृतींच्या अंतरंगामध्ये.

देहरूपी मंदिरामध्ये... मनाच्या चैतन्य गाभाऱ्यात ... मी आत्मदीप आहे. सर्व निराशेचा, अशांततेचा, गोंधळाचा अंधार दूर होऊन प्रकाश पसरवत आहे...त्या प्रकाशामध्ये माझे ध्येय मला स्पष्ट दिसत आहे. अशा प्रकारच्या विचारांच्या जाणीवपूर्वक निर्मितीचा अभ्यास रोज सकाळी निदान पाच ते दहा मिनिटे करूया. करून पहा नक्कीच फरक जाणवेल.

***

भेट भगवंताची

हे मानवा लवकरच आता परमधामाला जायचे आहे थेट
शिव भगवान सावध करीत आहे खुलणार आहेत स्वर्गाचे गेट ।।धृ।।

आत्मा परमात्माची ५००० वर्षातून या संगम युगात एकदाच होते भेट
शिव परमात्मा सतयुगासाठी ९ लाखच करीतो सिलेक्ट
भाग्यवानानाच मिळते ही अनोखी अनमोल स्वर्गाची भेट
या नवसृष्टीत लक्ष्मी नारायणाचे राज्य १२५० वर्षे चालते परफेक्ट
हे मानवा लवकरच आता परमधामाला जायचे आहे थेट ।।१।।

हे कल्प कल्पाचे अनादी नाटक फिरते ॲक्युरेट
परमात्मा शिव सावध करीतो देह अभिमान सोडा सरसकट
पश्चातापाची वेळ येऊ नये म्हणून वेळ घालवू नका फुकट
आता नाही तर कधीच नाही मुरलीतून बाबा करीतो शब्द प्रगट
हे मानवा लवकरच आता परमधामाला जायचे आहे थेट ।।२।।

प्रत्येक मनुष्य आत्म्याला दोन बाप आहेत एक लौकिक दुसरा पारलौकिक
पार लौकिक बाप सांगतो पुरुषार्थ केला तर तुम्हाला मिळेल स्वर्गाची भेट
महाविनाश नंतर खुलणार स्वर्गाचे गेट तिथेच होते श्रीकृष्णाची भेट
हे मानवा लवकरच आता परमधामाला जायचे आहे थेट ।।३।।

अरावली पर्वता वरती ब्रम्हातनी शिव झाले प्रगट
तुम्ही शरीर नाही आत्मा आहात इथे शिकवला जातो पाठ
आबू दर्शनला जरुर जावे व महान तीर्थस्थानला द्यावी भेट
जीवन सार्थक होईल व मुखातून शब्द बाहेर पडेल भगवानाची झाली भेट ।।४।।

ब्र. कु. जयवंत, सांगली

शेवटच्या पानाविषयी

जून महिना म्हणजे स्वाभाविकपणे मातेश्वरी जगदंबा यांची आठवण आल्यावाचून राहत नाही. तसेच भारत सरकारने घोषित केलेल्या 'योग दिवसाचीही' आठवण होते. राजयोग म्हणजे देहभान विसरून निराकाराची आठवण. अशा राजयोगातील सर्वोच्च स्थिती म्हणजे कर्मेंद्रियजीत अवस्था. मातेश्वरींनी ती अवस्था स्वतःच्या जीवनातून दाखवून दिली. अशा तपस्वी योगिनींची आठवण या निमित्ताने उजळून निघते.

श्रद्धांजली!

ब्र.कु नीलमबहन गेल्या ३१ वर्षांपासून मुलुंड सबझोन अंतर्गत भांडुप (पूर्व) सेवाकेंद्रावर सेवारत होत्या. दि. १८ एप्रिल २०२१ रोजी करोनाचं निमित्त होऊन आपल्या देहाचा त्याग करून त्या बाबांच्या कुशीमध्ये विसावल्या. त्यांचं शारीरिक वय ५५ होतं. भांडुप (पूर्व) सेवाकेंद्रावर त्या एक इष्ट देवी बनून राहिल्या. सगळ्या ब्रह्मावत्सांना ईश्वरी संगोपन देताना नेहमी हसतमुख, एकरस स्थितीत राहणे ही वैशिष्ट्ये त्यांच्यामधे होती. 'अंतर्मुखी सदा सुखी' या उक्तीप्रमाणे नीलमबहन मनाने आनंदी राहून वातावरण आनंदी ठेवत असत. त्यांचा चेहराही उमललेल्या फुलाप्रमाणे नेहमी आनंदी दिसायच्या. १९८२ मध्ये ईश्वरी ज्ञानामार्गात प्रविष्ट झालेल्या नीलमबहनचे लौकिक आई-वडीलदेखील बाबांचे निश्चयीवृत्तीचे, यज्ञस्नेही व अथक सेवाव्रती होते. तसेच त्यांचे तिन्ही लौकिक भाऊसुद्धा तन-मन-धनाने बाबांच्या कार्यात पूर्णपणे सहयोगी बनून ज्ञानमार्गात अग्रेसर होत आहेत. ब्र.कु. नीलमबहन यांनीदेखील बाबांच्या आठवणीत, अचल, अडोल राहून यज्ञसेवा केली. अशा सर्वांच्या आवडत्या, प्राणप्रिय बाबांच्या सुपात्र, लाडक्या लेकीला मुलुंड सबझोनच्या ब्राह्मण परिवाराकडून श्रद्धासुमन अर्पित करत आहोत.

←

ब्र. कु वीरेंद्र भाई - वाडा सेवाकेंद्र (जिल्हा - पालघर) बापदादा व ईश्वरी परिवाराचे लाडके, अनन्य रत्न ब्र. कु. वीरेंद्र भाई आपल्या पत्नीसह २७ वर्षांपासून ईश्वरी ज्ञानमार्गावर वाटचाल करत होते. कोविड साथीमुळे दिनांक १७ एप्रिल २०२१ रोजी त्यांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला. त्यांचं वय ७३ होतं.

→

ब्र. कु. राम भाई - वाडा सेवाकेंद्र (जिल्हा-पालघर) अथक सेवाधारी, बाबांचे लाडके असलेल्या ७३ वर्षीय ब्र. कु. राम भाईंचे कोविडमुळे दि. २२ एप्रिल २०२१ रोजी देहावसान झाले. ४० वर्षांपासून आपल्या पत्नीसह ते ईश्वरी ज्ञानमार्गावर वाटचाल करत होते.

←

ब्र. कु नारायण भाई - मुलुंड सेवाकेंद्र : ५४ वर्षांपासून ज्ञानमार्गावर चालणारे मुलुंड सेवाकेंद्राचे अनुभवी रत्न ब्र. कु नारायण भाई यांचे २१ एप्रिल २०२१ रोजी दुपारी ४ वाजता हृदयविकाराच्या झटक्याने देहावसान झाले. नष्टोमोहः वृत्तीने शरीररूपी जुन्या वस्त्राचा त्याग करून आत्मा बापदादांच्या कुशीमध्ये विसावला. भ्राताजी आपल्या सरळ स्वभावामुळे व मनमिळावू वृत्तीने नेहमीच ज्ञानयज्ञस्नेही या नात्याने जगले. त्यांचे संपूर्ण कुटुंबच ईश्वरी ज्ञानमार्गस्थ आहे. लौकिक आई-वडीलसुद्धा यज्ञस्नेही व सेवेत अथक होते. त्यांच्या तिन्ही लौकिक बहिणी (ब्र.कु कुंतीबहन, जानकीबहन आणि सरलाबहन) मुंबईमध्ये ईश्वरी सेवेत समर्पित आहेत.

गेल्या काही महिन्यात अनेक भागातील ब्रह्मावत्सांनी काही ना काही कारणाने देह ठेवला. अशा सर्वांना आम्ही श्रद्धासुमन अर्पित करत आहोत. स्थलाभावी सर्वांचा नामोल्लेख करणे शक्य नाही.

Registration No. : MAHMAR/2007/21914

राजयोगाद्वारे स्वस्थ मानव जीवन

२१ जून - आंतरराष्ट्रीय योग दिवस

जगदंबा सरस्वतीः

आदर्श राजयोगी जीवन